म. ग्र. म. ठाणे
विषय काव्य
सं. नं.
२१५८

श्रीशं वन्दे

卐

# काव्योदय ग्रंथमाला

किरण पहिलें



# पुष्प-वाटिका.

"कवि-मित्र-मंडळ"

दादर-मुंबई.

मकर संक्रांत शके १८४६.

REFBK-0019897
REFBK-0019897

# अनुक्रमणिका.


| नं. | विषय | पृष्ठ | नं. | विषय | पृष्ठ |
|---|---|---|---|---|---|
| १ | रसिकांस "कविमित्र-मंडळा"चा तिळगूळ | ३ | २२ | उदास हृदयाची हांक-- | २८ |
| २ | अभिप्राय ... | ५ | २३ | सौंदर्य प्रभाव ... | ३२ |
| ३ | प्रकाशकांचे हृद्गत ... | ९ | २४ | एकांतांतील खूण ... | ३२ |
| ४ | मंगल ध्यान ... | १ | २५ | आहे कां वशिला कांहीं | ३३ |
| ५ | ईशस्तवन ... | २ | २६ | एका कामुकानें केलेलें स्त्रीरूपाचें वर्णन | ३६ |
| ६ | वंदेमातरम् ... | ३ | २७ | त्याच साध्वी रूपवतीस पाहून एका सभ्य रसिकाचे उद्गार ... | ३७ |
| ७ | मराठ्यांचें ब्रीद ... | ४ | २८ | सुखकर सहवास ! ... | ३८ |
| ८ | महाराष्ट्र शारदेस-- ... | ४ | २९ | कर्मविराग ... | ४० |
| ९ | मुरली ... | ६ | ३० | स्वातंत्र-संगीत ... | ४१ |
| १० | शार्दूल-पंचक ... | ७ | ३१ | कोजागर ... | ४३ |
| ११ | दिलीप सत्व-परीक्षा | ८ | ३२ | अवस्थात्रय ... | ४५ |
| १२ | नदाचें पद ... | १२ | ३३ | फूल पाखरूं ... | ४६ |
| १३ | मनोहारिणी ... | १४ | ३४ | लतिका-लीला ... | ४७ |
| १४ | स्वारीवर गेल्यावर--- | १५ | ३५ | मोहन-मुरली ... | ४९ |
| १५ | "वदणारच नाहिं कशी!" | १६ | ३६ | स्फुट सुभाषितें ... | ५१ |
| १६ | दिल् दानत ... | १७ | ३७ | आजची स्वारी ... | ५३ |
| १७ | विरहाकुल यशोधरा... | १९ | ३८ | पञ्चवटी वर्णन ... | ५५ |
| १८ | पतिव्रता ... | २४ | ३९ | सद्गुरु शरणागति ... | ५७ |
| १९ | "संकटें ही कसोटीच आहे" ... | २५ | ४० | प्रासादाच्या द्वाराशीं... | ५९ |
| २० | बाल्यांतील पूर्ण सौख्य | २६ | ४१ | फक्त मागणें ... | ६० |
| २१ | पुराण पतिव्रता ... | २७ | | | |

काव्योदय ग्रंथ माला. किरण १ लें.

# पुष्प--वाटिका



प्रकाशक—"कवि मित्र-मंडळ" मुंबई

साजवाडी, दादर.

मकर संक्रांत शके १८४६ ]   किं. ८ आणे   [ जानेवारी सन १९२५

( सर्व हक्क स्वाधीन )

कविमित्र-मंडळ, दादर
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
१६८९०
REFBK-0019897

प्रकाशक
सदाशिव कृष्ण उपाध्ये
चिटणिस—" कविमित्र--मंडळ " साजवाडी, दादर-मुंबई.

" हिरण्मयी "

( खंड काव्य )

कवि " विपिन-विहारी "

मंडळामार्फत लवकर प्रसिद्ध होईल.

मुद्रक
श्री. रामचंद्र नारायण मंडलीक, बी. ए.
लोकमान्य प्रेस, रस्ती बिल्डींग,
गिरगांव, मुंबई नं. ४

रसिकांस 'कविमित्र-मंडळा'चा

# तिळगूळ

रसिकांनो ! हा तिळगुळ घ्या
मंजुळ वृत्ती फुलवा या.

* * *

निर्झर मधु-गीतें गाती
रसिक-वृंद किति गुंगविती
वृक्ष, लतादि कळ्या फुलती
प्रसन्न रसिकांना करिती
चंद्रकोर आणिक तारे
सागर जणुं व्योमीं पसरे
विहार तेथें कोण करी
सांगा ! रसिकांवीण तरी ?

स्वातंत्र्याच्या
नवस्फूर्तींच्या
चैतन्याच्या
सोज्वल वृत्ती फुलवाया
रसिकांनो ! हा तिळगुळ घ्या.

मकर संक्रांत १८४६ }
दादर–मुंबई. }

—वनराज.

काव्य ना. ठाणे.

# अभिप्राय.

१

दादर येथील 'कवि-मित्र-मंडळा'नें सुरू केलेल्या 'काव्योदय ग्रंथ माले'चें 'पुष्पवाटिका' नांवाचें पहिलें 'किरण' वाचून पाहिलें. सुरवातीचा " संक्रांतीचा तिळगूळ" सोडून दिल्यास या "पुष्पवाटिकेंत" "वसंतविहारांचीं" ८, "विपिनविहारींची" ७, "आचार्यांचीं" ६, "वनराजांचीं" व "कृष्ण-सुमंतांचीं" प्रत्येकीं ४ अशीं एकंदर २९ कवनें आहेत.

कवि 'वसंतविहार' यांचीं कवनें नेहमींप्रमाणें फारच चांगलीं वठलीं आहेत. त्यांतल्या त्यांत 'वंदे मातरम्' 'नदाचें पद' 'आहे कां वाचिलें कांहीं' व 'प्रासादाच्या द्वाराशीं' हीं पद्यें मला फारच आवडलीं. 'विपिनविहारीं'च्या पद्यांपैकीं 'मराठ्यांचें ब्रीद' 'विरहाकुल यशोधरा' व 'एकांतांतील खूण' हीं फारच सरस साधलीं आहेत. "विरहाकुल यशोधरा" हें कवन वाचीत असतां रघुवंशांतील 'अजविलापा'ची आठवण झाल्याखेरीज रहात नाहीं. या सबंध वाटिकेंतील उत्तमोत्तमांतील हें एक फूल आहे असें समजण्यास हरकत नाहीं. आचार्यांच्या कृतिपैकीं माझ्यामतें 'पतिव्रता' 'अवस्थात्रय' हीं फारच सुंदर आहेत. अभंगासारख्या साध्या वृत्तांतहि कवि बहार उडवून देऊं शकतो हें 'अवस्थात्रयी'वरून समजण्यासारखें आहे. 'वनराजां'च्या 'सुखकर सहवासाचा' सहवास त्यांच्या इतर कवनांच्या सहवासापेक्षां वाचकांस अधिक सुखकर होईल असें वाटतें. 'कृष्ण-सुमंतांनीं' 'मोहन-मुरली' व 'शार्दूल पंचक' यांत खूप बहार केली आहे. 'शार्दूल पंचक' वाचीत असतांना इंग्लिश काव्याभिज्ञांस 'वर्डसवर्थ' कवीच्या " The Happy Warrior " ची आठवण होईल.

एकंदरीत या पुष्पवाटिकेंतील विहार व तेथील मधुर पुष्पामोद-सेवन यांनीं, आरंभींच कवि 'वनराजांनीं' सांगितल्याप्रमाणें रसिक वाचकवृंद भृंगांच्या "स्वातंत्र्याच्या, नवस्फूर्तीच्या व चैतन्याच्या सोज्वल वृत्ति" फुलल्याखेरीज रहाणार नाहींत.

विष्णू कृष्ण जोशी एम. ए. एस. टी. सी.
प्रिन्सिपॉल, जनरल एज्युकेशन इन्स्टिटयूट, दादर-मुंबई.

२

दादर-मुंबई येथील 'कवि-मित्र मंडळा' मार्फत प्रकाश पावलेलें 'काव्योदयग्रंथमाले'चें पहिलें किरण "पुष्प-वाटिका" वाचून पाहिलें. शिशिर ऋतूंतील बालरवीच्या प्रथम किरणाप्रमाणेंच सदरहू किरण आल्हाददायक व स्फूर्तिदायक आहे. सदरहू किरणानें फुलविलेलीं पुष्प-वाटिकेंतील कांहीं पुष्पें खरोखरीच राष्ट्रदेवतेच्या चरणीं वाहण्यालायक अशीं, उज्वल, पवित्र व सौगंधिक आहेत. मनःसंस्कृति व मनोरंजन यांजबरोबरच राष्ट्रोद्धारार्थ देह झिजविण्याची स्फूर्ति मनाला देणारें वाङ्मय हेंच खरें राष्ट्रीय वाङ्मय होय. त्याही दृष्टीनें सदरहू किरण अभिनंदनीयच आहे. त्या त्या काळीं प्रसिद्ध होणारें वाङ्मय ज्या प्रमाणें लोकांच्या मनांतील विचारांचें प्रतिबिंब असतें त्याचप्रमाणें तें लोकांच्या आचारविचारास नवीन वळणही देत असतें. सदरहू पुष्पवाटिकेंत ज्या आधुनिक कवींची कृति प्रसिद्ध झाली आहे त्यांचीं मनें आम्हां मराठ्यांविषयींच्या योग्य अभिमानानें भरलेलीं आहेत व देशोद्धाराविषयीं त्यांचें चिंतन चाललें आहे हें पाहून मनाला समाधान वाटतें व भावी उत्कर्षाबद्दल खात्री वाटूं लागते.

केवळ काव्य या दृष्टीनेंहि या वाटिकेंतील पुष्पांचें निरीक्षण केलें तरी महिन्याच्या महिन्यास निरनिराळ्या मासिकांतून व वेळोवेळीं स्वतंत्र लहान लहान पुस्तकांतून प्रसिद्ध होणाऱ्या काव्यांपेक्षां हीं पुष्कळच सुरस आहेत. विशेषतः "मराठ्यांचें ब्रीद," महाराष्ट्र शारदेस, मुरली, विरहाकुल

यशोधरा, स्वातंत्र्य—संगीत, मोहन मुरली, कोजागर वगैरे कृति बऱ्याच वरच्या दर्जाच्या व हृदय हलविणाऱ्या आहेत.

कार्शीनाथ नारायण धारप
बी. ए. एल. एल. बी. हायकोर्ट, वकील, ठाणें.

३

काव्योदय ग्रंथमालेच्या पहिल्या किरणाची हस्तलिखित प्रत माझे मित्र रा. सदाशिव कृष्ण उपाध्ये यांनीं मला वाचण्यास आणून दिली याबद्दल मी त्यांचा अत्यंत आभारी आहें. यांतील सर्व कविता वाचून माझ्या अल्पमतीला असें वाटलें कीं, काव्यप्रेमी वाचकांस या ' पुष्प-वाटिकेंत ' घटकाभर बसून विश्रांति घ्यावीशी वाटेल यांत शंका नाहीं. ' अभिरुचि कोणा शृंगाराची, कोणा वीररसाची ' या कव्युक्तीप्रमाणें निरनिराळ्या रसांचा आस्वाद या वाटिकेंत वाचकांना मिळेल; पण पुष्पांतील मकरंद चाखीत असतांना यतिभंगाचे अगर ' आक्रामि ' ' पावित्र्यता ' यासारख्या शब्दप्रयोगाचे कांटे क्वचित् बोंचल्याशिवाय रहात नाहींत. ' फूलपांखराच्या ' रंगाला मोहून जावें तों पद्यात्मक गद्यरसाचा आस्वाद मिळाल्यामुळें विरस होतो. ' उदास हृदयाची हांक ' ' कोजागर ' ' लतिका-लीला ' ' प्रासादाच्या द्वाराशीं ' वगैरे बऱ्याच कविता सुंदर साधल्या आहेत. ' एकांतांतील खूण ' ज्याची त्यालाच पटणार. इतरांना अनुभवाशिवाय ' खुणेंतील ' रहस्य कळणार नाहीं ! अगदीं साधा विषय कवि आपल्या प्रतिभेनें कसा रंगवितो याचें ' आहे कां वशिला कांहीं ' हें काव्य चांगलें उदाहरण आहे. एकंदरींत वाटिकेंत घटकाभर विहार केल्यानें थकलेल्या मनास विश्रांति मिळून तेथील फुलाप्रमाणें तेंही प्रफुल्लित होतें; व वाटिकेपेक्षांहि निराळ्या आनंदमय वातावरणांत आपण फिरत आहों असा त्यास भास होतो. सरते शेवटीं पुन्हां एकदां रा. उपाध्ये यांचे आभार मानून हा अभिप्राय संपवितों.

कृष्णाजी वामन चितळे बी. ए.

संग्रह शाखा (स्थळ प्रत)
कां. ग्रं. सं.
ग्रंथ नं. ५७२८
ठाणे.

# प्रकाशकांचें हृद्गत.

## गुरुवर्यांचा मंगल आशिर्वाद.

योऽनेकधा हरिहराद्यभिधानरूपः
आत्मानमेव भगवान् विशदीचकार ।
एकः स एव सकलः पुरुषः पु ाणः
काव्येषु वोऽपि नवमंगलमातनोतु ॥ १ ॥

परमेश्वराच्या कृपेनें आणि गुरुजनांच्या मंगल आशिर्वादानें हातीं घेतलेल्या कामांत पूर्ण यश येऊन आजच्या या सुमंगल प्रसंगीं " काव्यो-दय ग्रंथमाले"च्या पहिल्या किरणांत ही ' पुष्प–वाटिका ' रसिकांना दाखविण्यास मंडळास फार आनंद वाटत आहे.

आज "कविमित्र–मंडळा"च्या मालेचें हें पहिलेंच किरण असल्यामुळें प्रथमारंभीं मालेविषयीं दोन शब्द सांगणें अवश्य आहे.

या मंडळानें " काव्यवाङ्मयाची एकनिष्ठपणें सेवा करावयाची " असें ध्येय ठरविलें आहे. आणि त्याकरितां ही " काव्योदय ग्रंथमाला " मंडळामार्फत सुरू करण्यांत आली आहे. अर्थात या मालेमध्यें जीं पुस्तकें निघावयाचीं तीं सर्व काव्यविषयकच निघावयाचीं हें उघड आहे मग तीं पुस्तकें गद्यमय असोत कीं पद्यमय असोत.

तसेंच ' कविमित्र–मंडळ ' हें कवींच्या मित्रांचें मंडळ आहे. महाराष्ट्रीय कवींच्या गुणांचें कौतुक करून त्यांना उत्तेजन देऊन त्यांच्याकडून वाङ्मयसेवा घडवून आणणें हेंही मंडळाच्या इतर अंगांपैकीं एक अंग आहे.

श्रीयुत महादेव हरी मोडक बी. ए. यांचेकडून कविता फार उशीरां आल्यामुळें त्यांच्या कविता अभिप्रायास पाठवितां आल्या नाहींत व

त्यामुळें त्यांच्याकवितांवर अभिप्राय दिले गेले नाहींत, असो. या ‘ पुष्प--वाटिकें ’ वर रा. रा. विष्णु कृष्ण जोशी एम्. ए. एस, टी. सी. प्रिन्सिपॉल ज. ए. इ. दादर मुंबई. रा. रा. काशिनाथ नारायण धारप बी. ए. एल. एल. बी. हायकोर्ट वकील ठाणें, रा. रा. कृष्णाजी वामन चितळे बी. ए. या विद्वान--रसिकांनीं आपला अमूल्य वेळ खर्च करून अभिप्राय दिले; व मंडळाबद्दल जें प्रेम दाखविलें त्याबद्दल त्या सर्वांचें मंडळ सदैव ऋणी राहील. तसेंच लोकमान्य प्रेसचे मॅनेजर यांनीं सदरहू ‘ पुष्प--वाटिका ’ अवघ्या १५ दिवसांत आणि तीहि लोकमान्य दैनिकाचा महाराष्ट्र अंक छापावयाच्या धांदलींतच छापून आजच्या या सुमंगल प्रसंगीं प्रसिद्ध करावयास संधि दिली याबद्दल त्यांचे आभार मानावे तितके थोडे आहेत. असो.

इतका वेळ रसिकांचा पुष्प--वाटिकेंत जाण्याचा रस्ता अडवून धरल्याबद्दल रसिकांची प्रेमभावानें क्षमा मागून त्यांचा पुष्प--वाटिकेंत जाण्याचा रस्ता खुला करितों.

सर्वांचा नम्र.

मकर संक्रांत शके १८४६.
साजवाडी, दादर--मुंबई.

सदाशिव कृष्ण उपाध्ये.
चिटणीस -कविमित्र--मंडळ.

काव्योदय ग्रंथ माला. किरण पहिलें.

# पुष्प-वाटिका.



## मंगलध्यान.

या कुन्देन्दुतुषारहारधवला या शुभ्रवस्त्रावृता
या वीणावरदण्डमण्डितकरा या श्वेतपद्मासना ।
या ब्रह्माच्युतशङ्करप्रभृतिभिर्देवैः सदा वन्दिता
सा मां पातु सरस्वती भगवती निःशेषजाड्यापहा ॥

# ईशस्तवन

१

( राग—भूप )

तुज्य नमन हें जगदाधारा !
जड-जंगम-हृदयांबुजसारा ! ॥ धृ० ॥

स्मृति, बल, कृति, फल, मति, गति देईं ।
परिचर्या ही मानुनि घेईं ।
परिजन अर्पि सुमनहारा ॥ १ ॥

२

( भज भज भव जलधिमाजि० )

सविनय करूं नमन सकल कमलावराला ॥ धृ० ॥
मंगलमय रम्य हास्य ।
नवलक्ष्मी शुचिविलास ।
करित सफल नत जनास ।
तोडि बंधनाला ॥ १ ॥
करुणेचा चंद्र रुचिर
आत्मदर्शनास मुकुर ।
जनहंसा शुभ दिनकर
कविराजयाला ॥ २ ॥

दादर-मुंबई.

“ वसंतविहार ”

ग्रंथ संग्रहालय
ठाणे.

# वंदे मातरम्




( गझल )

भारताला पूर्ण प्यारा मंत्र वंदेमातरम्
विश्वसुंदर विश्वमोहक मंत्र वंदेमातरम्
दिल्रुबा हा मंजुभाषी मंत्र वंदेमातरम्
बुद्धिदाता अंशुमाली मंत्र वंदेमातरम्
भोजनीं शयनीं वदा हा मंत्र वंदेमातरम्
हरघडी हरदम् जपा हा मंत्र वंदेमातरम्
कल्पतरु पुरवील मनिची आस वंदेमातरम्
वीर्यशाली निर्झराचें सार वंदेमातरम्
छेदुनी शिर दूर करितां मंत्र वंदेमातरम्
मृत्युच्या सदनांत शिरतां मंत्र वंदेमातरम्
बंदिशालावास घडतां मंत्र वंदेमातरम्
शृंखला झंकार तो हो नाद वंदेमातरम्
तीर धनुचा अस्त्रमय हा मंत्र वंदेमातरम्
चेतनेची नंगि ही समशेर वंदेमातरम्
हिंदवासी घोष घुमवा पूर्ण वंदेमातरम्
हा " वसंतविहार " म्हणत ईश्वराशीं इत्यलम्

५-११-२१ दादर — वसंतविहार.

# मराठ्यांचें ब्रीद

( शार्दूल विक्रीडित ) ७

सारोनी सुखसोहळा स्वगृहिंचा तानाजि झेंपावला—
कोंडाण्यावरि विक्रमा करुनि कां तो सिंह विश्रामला ?
नाहीं एक तसूभरीहि हटला रक्ताचिया शिंपणीं
बाजी पावन खिंडिमाजि निजला बोला कशाला तरी ?
शौर्या वीर मुरारिच्या निरुपमा कोणी दिली चालना ?
कोण्या शक्तिवशें कबंध लढले सांगा शिरावेगळें ?
दाभाडा निघतां धन्यास समर्यो पाठीवरी घेउनी
रक्ताची गुळणी वमूनि पडला कां जिंजिवासीं वदा ?
हातें हीरकणी दिली भगिनिला, गोळा बळी पोटचा—
खंडोजी निज दे प्रसंगिं, नव्हतें कां त्या वदा काळिज ?
चौफेरी तुटक्या नभास ठिगळें लावावया धांवला
बांका गोकलखां किमर्थ समरीं गेला कटोनी बरें ?
जाती सांगुनि धीर वीर कृतिनें ते या जगा लागुनी
" आम्हांला मरणेंहि तुच्छ गमतें राष्ट्राचिया कारणीं ! "

भायखळा, मुंबई. —विपिन--विहारी.

---

# महाराष्ट्र शारदेस—

बोल बोल ! शारदे ! अतां तरि राष्ट्रिय कवनांचे
मर्दपणाचे, वीरश्रीचे, चढत्या मानाचे
नकोच नुसते मुग्धपणाचे मुके बोल फोल
महाराष्ट्र शारदे ! समयिं या हृदयातें खोल

मुक्या मनाचीं गाणीं म्हणुनी मुकींच कां गावीं ?
दिन ते गेले, हृदयें आतां स्पष्टचि उकलावीं

*　*　*　*

कळ्या फुलोनि फुलें हांसती स्वातंत्र्या वरिती
स्वतंत्रतेच्या वातावरणीं आनंदें डुलती
स्वातंत्र्याचीं गाणीं गाती खग जिकडे तिकडे
बंधविमोचन होऊन भृंगहि गुंगत चोंहिंकडे
निसर्गी स्वातंत्र्याचा ध्वनि जणुं मूर्तिमंत घुमत
उठव शारदे ! प्रतिध्वनी तो तुझिया गीतांत

*　*　*　*

' निशाण ' वाला ' तुतारि ' फुंकित ' श्रेया ' शोधीत
" ऊठ भारता ! " म्हणोनि गेला दौडत डौलांत
' हिरकणि ' दाउनि जाई ' स्वातंत्र्याचा शाहीर '
' कृष्ण कुमारी ' ' वीरमती ' ती गाई ' जोहार '
निसर्ग-चंडोलाचीहि लागे शाहीरी तार
' राष्ट्रगायत्री ' हा मंत्राचि कथी ' धर्मवीर '
' सिंहगडा ' चा ' सिंह ' उसळवी ' सागर ' खळबळवी
स्वातंत्र्याच्या कवन-सुमांचा सुगंध दरवळवी
स्वातंत्र्याचें ' रहस्य ' सांगुनि जाति ' लोकमान्य '
यांसम होई प्रगट शारदे ! महाराष्ट्र धन्य !

*　*　*　*

महाराष्ट्र शारदे ! तुझा ना महाराष्ट्र देश ?
स्वातंत्र्याचा कथण्या लागे कां मग संदेश ?
प्रेरक देवी ! मंगल देवी ! तुझ्या प्रतापांनीं
स्वातंत्र्याच्या लाटा दिधल्या अंबरिं उसळोनी

## मराठ्यांचें ब्रीद

( शार्दूल विक्रीडित )

सारोनी सुखसोहळा स्वगृहिंचा तानाजि झेंपावला—
कोंडाण्यावरि विक्रमा करुनि कां तो सिंह विश्रामला ?
नाहीं एक तसूभरीहि हटला रक्ताचिया शिंपणीं
बाजी पावन खिंडिमाजि निजला बोला कशाला तरी ?
शौर्या वीर मुरारिच्या निरुपमा कोणी दिली चालना ?
कोण्या शक्तिवशें कवंध लढलें सांगा शिरावेगळें ?
दाभाडा निघतां धन्यास समर्यी पाठीवरी घेउनी
रक्ताची गुळणी वमूनि पडला कां जिजिवासीं वदा ?
हातें हीरकणी दिली भगिनिला, गोळा बळी पोटचा—
खंडोजी निज दे प्रसंगिं, नव्हतें कां त्या वदा काळिज ?
चौफेरी तुटक्या नभास ठिगळें लावावया धांवला
बांका गोकलखां किमर्थ समरीं गेला कटोनी बरें ?
जाती सांगुनि धीर वीर कृतिनें ते या जगा लागुनी
" आम्हांला मरणेंहि तुच्छ गमतें राष्ट्राचिया कारणीं ! "

भायखळा, मुंबई.

—विपिन-विहारी.

---

## महाराष्ट्र शारदेस—

बोल बोल ! शारदे ! अतां तरि राष्ट्रिय कवनांचे
मर्दपणाचे, वीरश्रीचे, चढत्या मानाचे
नकोच नुसते मुग्धपणाचे मुके बोल फोल
महाराष्ट्र शारदे ! समार्थे या हृदयातें खोल

मुक्या मनाचीं गाणीं म्हणुनी मुकींच कां गावीं ?
दिन ते गेले, हृदयें आतां स्पष्टचि उकलावीं

* * * *

कळ्या फुलोनि फुलें हांसती स्वातंत्र्या वरिती
स्वतंत्रतेच्या वातावरणीं आनंदें डुलती
स्वातंत्र्याचीं गाणीं गाती खग जिकडे तिकडे
बंधविमोचन होऊन भृंगहि गुंगत चोहिंकडे
निसर्गीं स्वातंत्र्याचा ध्वनि जणुं मूर्तिमंत घुमत
उठव शारदे ! प्रतिध्वनी तो तुझिया गीतांत

* * * *

‘ निशाण ’ वाला ‘ तुतारि ’ फुंकित ‘ श्रेया ’ शोधीत
‘ ऊठ भारता ! ’ म्हणोनि गेला दौडत डौलांत
‘ हिरकणि ’ दाउनि जाई ‘ स्वातंत्र्याचा शाहीर ’
‘ कृष्ण कुमारी ’ ‘ वीरमती ’ ती गाई ‘ जोहार ’
निसर्ग-चंडोलाचिहि लागे शाहीरी तार
‘ राष्ट्रगायत्री ’ हा मंत्राचि कथी ‘ धर्मवीर ’
‘ सिंहगडा ’ चा ‘ सिंह ’ उसळवी ‘ सागर ’ खळबळवी
स्वातंत्र्याच्या कवन-सुमांचा सुगंध दरवळवी
स्वातंत्र्याचें ‘ रहस्य ’ सांगुनि जाति ‘ लोकमान्य ’
यांसम होई प्रगट शारदे ! महाराष्ट्र धन्य !

* * * *

महाराष्ट्र शारदे ! तुझा ना महाराष्ट्र देश ?
स्वातंत्र्याचा कथण्या लागे कां मग संदेश ?
प्रेरक देवी ! मंगल देवी ! तुझ्या प्रतापांनीं
स्वातंत्र्याच्या लाटा दिधल्या अंबरिं उसळोनी

तशीच उडवी स्वातंत्र्याची पुन्हां एक लाट
परदास्याचा दुभंग पावो कीं हा क्षणिं कोट
महाराष्ट्र शारदे ! येइ तूं वेगें धांऊनी
तव दासांच्या स्वातंत्र्यास्तव दिव्य रूप धरुनी.

दादर--मुंबई. —वनराज.

---

# मुरली

नवनादलहरि ही भरली । वाजवी काय हरि मुरली ? ।।धृ०।।
स्वर मंजु-मधुर हे उठती । हरिचीच तान सुचवीती ।
जागृत कां द्वापाराचा । तो सखा आज गोपींचा ? ।
धर्माचि ग्लानि बघुनी कां । अवतरे नाथ भू-लोकां ? ।
चाल—ऐकुं या बोलतो कांईं
गोपात्मज नवनवलाइ
भुवनभर-वाहे । उगवली पूर्व पुण्याई ॥ १ ॥
निजलासी आर्यावर्ता । निश्चिंत काय हा आतां ? ।
परदास्य काय सेवाया । गीतार्थ वदे मी वायां ? ।
मतिमंद काय प्रसवाया । गीतार्थ बोधिला वायां ? ।
कीं धर्मबंधनें त्यजुनी । बोधिलें स्वैर संचरणीं ? ।
चाल—पूर्विची संस्कृती कांहीं
तूं जागृत नयनीं पाहि
उठ लवलाही । मी कृष्णसखा तुज बाही ॥ २ ॥
भुलुं नको इंद्रियार्थाला । स्वायत्त करी चित्ताला ।
त्यजुं नको स्वाभिमानाला । परदास्य काय वीराला ? ।

काव्य ५७८

उभि ठेव नित्य नयनाला । भारत-वीरांची माला ।
संग्राहक निजधर्माला । स्मर; पोषि ऐक्य बुद्धीला ।
चाल—अंतरीं शोधुनी पाही
राजांचा राजा होइ
ऊठ लवलाही । मी कृष्णसखा तुज बाँही ॥ ३ ॥
मुरलिनें तानभुक हरली । श्रीकृष्णचरणिं मति मुरली ।
दैन्याची वार्ता नुरली । सृष्टि ही कृष्णमय भरली ।
कर्तव्यजागृती झाली । निष्काम बुद्धि अवतरली ।
चाल—गोवर्धनधारी ताता !
राक्षि आर्त आर्यावर्ता
धांव दे हातां । एक तूंचि जगता त्राता ॥ ४ ॥

नाडसूर. —मा. ना. आचार्य.

---

# शार्दूल--पंचक

( वसंततिलका )

लावण्य-धाम नव-यौवन-कामिनींही ।
जे वर्षिले नयन-बाण मनोज्ञ तेही ।
साहून जो विवश ना रतिमात्र होतां ।
लावी रणीं रिपुदला झणिं स्वर्ग-पंथा ॥ १ ॥

कंठीं सुकोमल मिठी हृदयंगमा जी ।
चंद्रानना रमणि घालि, त्यजून तीही ।
जीवा-सुभोगयुतशा तृणवत् गणोनी ।
निर्दाळि जो अरिजनां समरीं रिघोनी ॥ २ ॥

होतांचि तें नयनगोचर दृष्टि-तेज ।
खेदे, बलाढ्य, रिपुचे रणरंगराज ।
ठेवूनि शस्त्र नमिती चरणारविंदा ।
सम्मर्द हा म्हणाति हो तव पूर्ण बंदा ॥ ३ ॥

यत्कीर्तिदुंदुभि-रवा परिसोनि वीर ।
भीती, गुहांत दडती तम जेथ घोर ।
ऐश्वर्य-भास्कर-करांप्रति शत्रु-लोक ।
भीती, गमे असाति साचचि ते उलूक ॥ ४ ॥

कर्तव्यकर्म करि मेळवि पुण्य-लाहो ।
संतोषवी सुर-पुरीं कुल-पूर्वजां हो ।
तो भाग्यशालि नर-शार्दुल धन्य ! त्यातें—।
अर्पितसें समुद शार्दुल-पंचकातें ॥ ५ ॥

पणदरें —कृष्ण सुमंत.

---

# दिलीप सत्व–परीक्षा

उप०—सुदाक्षिणानाथ दिलीपनामा
जो वर्धवीता रवि-वंश-धामा
वसिष्ठ धेनूस पुढें करोनी
गोप्ता शिरे मानद घोर रानीं ॥ १ ॥

हिमालयाची वनराजि दाट
भल्लूक-पंक्ती करि थैथयाट
मधेंच तो व्याघ्र करी निनाद
कर्णीं पडे अंतारें सिंहनाद ॥ २ ॥

सरी स्तृपांची मधुनीहि भीति
होतीच ती त्या हिमवद्वनांतीं
अशांत तो आश्रम--वर्ण--पाता
संचारवी निर्भय धेनु--माता ॥ ३ ॥
बसे तिला पाहुनि बैसलेली
ती चालतां मागुति धांव घाली
तसाच राहे उभि तीस पाहुनी
छायेपरी धेनुसवें फिरे वनीं ॥ ४ ॥
ऐशापरी भूपति चापपाणी
नतां वनीं धेनुस तो जपोनी
पाहे पुढें भीषण सिंह मूर्ती
संपातसज्जा मुनि--धेनु--घातीं ॥ ५ ॥
क्षणांत जों चापगता शरा करी
आक्रामि तों धेनुस वन्य केसरी
लक्षूनि त्या सोडि शरावली रयें
तथापि तो अक्षत सिंह कीं स्वयें ॥ ६ ॥
दिङ्मूढ हें पाहुनि भूप मानसीं
निंदी स्वतेजा धृति-शौर्य-राशि
म्हणे कसा सत्त्व--विनाश झाला
तोंची तया हांसत सिंह बोलला॥ ७ ॥
नको श्रमा व्यर्थ करूं नृपाला
कामा नये ही तव बाणमाला
प्रवात उन्मूलावि पादपांतें
कसा परी कंपावि भूधरातें ? ॥ ८ ॥

नृपोत्तमा ! वन्य पशू म्हणोनी
मातें न तूं केवल तात ! मानी
विख्यात जो नायक योगियांचा
मी त्या असे सेवक शंकराचा ॥ ९ ॥

आहेस तूं वीर शिरोमणी हें
भूपा मला ज्ञात नसे न पाहें
सुखेंच जा पाळि वसुंधरेला
भक्षी, न मी सोडि, पयस्विनीला ॥ १० ॥

व० ति०—पाहोनि आत्म-बल-रुद्ध हरप्रसादें
चित्तास भूमिपतिच्या त्यजिलें विषादें
अत्यादरें स्मरुनि तो भव-वैभवाला
कार्यज्ञ भूमिप वदे विनयें हरीला ॥ ११ ॥

दाता सदाशिव जगीं बहुमान्य झाला
त्याचाच तूं अनुग सेवि तया व्रताला
हें अर्पितों निजशरीर तुझ्या क्षुधेला
धेनूस सोडि पुरवी मम कामनेला ॥ १२ ॥

ऐकोनि हें वचन वीर नृपोत्तमाचें
आलें मनांत भरतें हरिच्या रसाचें
देऊनि मानसिं तया बहु धन्यवाद
बोले सकौतुक पुन्हां करण्या विवाद ॥ १३ ॥

तारुण्य हें नव तुझें विलसे शुभांग
एकातपत्र नव राज्य तसें अभंग
हें देशि एक मुनि धेनुस वांचवाया
राया ! कसा करिशि हा अविचार वायां ॥ १४ ॥

उप०—ऐशापरी केसरिची गिरा ती
गंभीर मूर्ती परिसोनी भूपति
वदे सुधास्राव समान वाणी
प्रत्युत्तरीं क्षत्र-हितार्थ-कारिणी ॥ १५ ॥
तूं भूत-नाथानुग धर्मवेत्ता
ही याज्ञिया मानद आर्षमत्ता
स्वदेह पातावधि रक्षणीया
हें कां न ठावें तुज माननीया ? ॥ १६ ॥
रक्षी क्षतापासुनि पीडिताला
क्षत्रार्थ हा लोकिं उदंड झाला
योजूनिया ही मुनि धेनु घाता
राहे तिचा अक्षत कोंवि गोप्ता ? ॥ १७ ॥

व० ति०—तेजोनिधि प्रसविता सविता जयातें
सद्वंश मानी बहुतो नच भौतिकांतें
ऐश्वर्य नश्वर अशाश्वत देह माझा
योजी मृगाधिप ! महामुनिच्या सुकाजा ॥ १८ ॥

उप०—उदार जों प्रार्थित हें अशा परी
महामती भूमि-पती तया करी
आश्चर्य उत्पादित भूप अंतरीं
अदृश्य होई सहसाच केसरी ॥ १९ ॥

मालिनी—चकित नृपतिला तों ती वदे धेनुमाता
मुनिवरवश माया जाण ही सर्व ताता !
वरद गुरुवसिष्ठें दावुनी हा प्रभाव
तव रविकुलधामा मापिला सत्त्वभाव ॥ २० ॥

उप०—ऐकोनि हें भूप मनीं निवाला
जो अन्यथा जय्य न वासवाला
मुनींद्र पादांबुज-वंदनाला
तशाच तो धेनुसवें निघाला ॥ २१ ॥
शा०वि०—जेथें श्रेष्ठ वसिष्ठ तुल्य मुनि ते ज्ञानी जनीं पावले
दाते भूप दिलीपसे बहुभले सिंहासनीं शोभले
तें हें भारतखंड धन्य भुवनीं मद्बंधु हो ! आदरा
चिंतुनी मनिंया दिलीप चरिता-तें पूर्व कांहीं स्मरा॥२२॥

नाडसूर, —मा. ना. आचार्य

---

## नदाचें पद

( नर जन्मामधिं नरा० )

काल न ठावें स्फूर्तिबलें मी ब्रह्मगगन सोडिलें
दैवहिमशैलशिखर गांठिलें ॥ धृ० ॥
स्वानंदाच्या वातावरणीं प्रणव नाद उमटले
ते म्यां मौन धरुनि ऐकिले ।
मृत्युलोक हा कसा ? पहावा सहेतु घालुनि उडी
दिली म्यां हिमालयाला दडी ।
देवदारु जनवनांत चमकत शैशव मधुतर भले
दऱ्याखोऱ्यांत पुर शोभले ।
टेंकड्या तोडिल्या किती गिरींचे कडे
टवकारुनि नयनां जणूं बघति मजकडे
मज माहित ही मृत्तिकापूर्ण माकडें

पथांत आलीं उडवुनि दिधलीं पर्णकुटींचीं कुळें
जनांचे हाल कुणी पाहिले ! ॥ १ ॥
यौवनांत शिरतांच जनांच्या हृदयीं उमटे ठसा
पहाया येति मला राजसा ।
खंड दहावें काशी बघतां आदरिलें मी तया
जनांला विश्वेश्वर दे जया ।
नरनारींचे थवे लोटती वारुळिं मुंग्या जशा
अथवा धरि नक्षत्रें निशा ।
मनांत माझ्या एकच आशा दुथडी गंगा भरे
तिला मी मिळेन केव्हां बरें ? ।
जन येतिल जातिल करुनी तीर्थें पुरीं
मी अखंड रूपें सदा असावें परी
ही एक कल्पना जागरूक अंतरीं
नवगानाच्या नव्या लकेऱ्या घेत विहंगांसवें
पिओनी पवनाचीं आंसवें ॥ २ ॥
स्फटिक पथांतुनि जातां गातां गीतें मंजुल अशीं
डुले तो माझ्यासंगें शशी ।
दुथडी गंगा भरूनि चाले मिळेन केव्हां तिला
झपाझप उचलुनियां पाउलां ।
वळसे घेउनि कितिदां भ्रमलों इकडुनि तिकडे तरी
मिळेना अझूनि ती सहचरी ।
इथें पहावी गुप्त जाहली तिथें पहातां दिसे
गमे कीं मलाच भरलें पिसें ।
ती पूर्ण योगिनी तेजोरस-धारिणी

ती मनोमोहिनी विश्वताप-हारिणी
ती हंसवाहिनी चित्तसौख्य-कारिणी
याच दिशेनें जाय म्हणोनी त्याच दिशेला वळें
कधीं हो भेट कुणाला कळे ? ॥ ३ ॥

पय:फेनधवलांग हातसें रजतरसें न्हाउनी
कधीं मी सुवर्णाचिया गुणीं ।
वसंतकाळीं कळ्या फुलाव्या प्रांत तसे फुलवुनी
जात मी नगरानगरांतुनी ।
सुखदुःखाच्या दोन तटांवरि पिकतीं शेतें मळे
त्यांतुनि लपत छपत मी पळें ।
दुथडी गंगा भरून चाले अनंत रत्नाकरा
कधीं भेटेन दिवस तो खरा ।
जन येतिल जातिल तीर्थ करुनी पुरीं
मी अखंड रूपें सदा असावें परी
ही एक कल्पना जागरूक अंतरीं
गात " वसंतविहार " नदाच्या पदांत जादू भरी
फेंकुनी देई रसिकांवरी ॥ ४ ॥

८--९--२२, दादर. —वसंतविहार

---

# मनोहारिणी

( शार्दूलविक्रीडित )

मूर्ती मोहक गोजिरी रति दुजी ऐशी मनोहारिका ।
हृत्प्रांतीं निवसे विचार नुरवी जी भ्रांतवी मस्तका ।

ती मूर्ती बघण्या उतावीळ अती होवोनियां अंतरीं ।
आलों सर्वहि कामधाम त्यजुनी गेहाप्रती सत्वरी ॥ १ ॥
येतां द्वारिं दिसे सुरम्य रमणी जी मूर्त पावित्र्यता ।
स्वर्गांतील विलासनी विरमती पाहून यद्दिव्यता ।
लावण्यें विनयें अलंकृत असे जी सद्गुणाची खनी ।
ती माझी सुम-कोमला सहृदया राणी मनोहारिणी ॥ २ ॥
गेले तारवटोनि मन्नयन तें सौंदर्य पाहोनियां ।
झाली गुंग मति भ्रमिष्ट बनलों शुद्धीहि गेली लया ।
गात्रें सर्वहि तीं शिथील बनलीं चैतन्य गेलें लया ।
गेली उद्भवुनी विचार--लहरी हृत्सागरीं जी लया ॥ ३ ॥
ती ही कीं, मज राहुं द्या सततची ऐसा जगन्मोहना !
कल्पांतींहि नका स्थिती दुरवुं जी आधार मज्जीवना !

पणदरें. —कृष्ण सुमंत.

---

# स्वारीवर गेल्यावर–

[ स्वारीवर गेलेल्या जिवलगासाठीं झुरणारा जीव त्याजकडून कांहींच बातमी न आल्यामुळें काय काय म्हणून आठवणार नाहीं ? ]

**साकी**

हातावरती हात देउनी सख्या ! वायदा केला
डोळे लावुनि बसल्यें अनुदिन विसर काय तुज पडला ?
शिलेदार समुदायामधिं तूं हिराच चकमकणारा
गारगोटि ही समजुनि विसरशि कांरे मज निष्ठूरा !
पहिल्या नजरेला वद हृदयीं बाण कुणी मारीला ?
आणभाक देउनी कुणी हा भोळा जिव भुलवीला ?

स्वारीवर निघतांना " कळविन खबर तुला साजणी !"
" रणनवरी तुज येइन " वदशी असें " सवत घेऊनी "
हांसुनियां मी नजर मुरडितां हनू राजसा ! धरुनी
अधर चुंबिला—आठव तनुला कसा थरकवी अजुनि !
नजरेला मम नजर पुरविशी मुरडुनि वारूवरुनी
होत्यें हांसत दाबुनि हृदया अश्रु रोधुनी नयनीं !
तटावरुनि मी भरल्या नयनीं बघ झोंकदारसा
वाऱ्यावरती झळके फडफड हिरवा मंदील तुझा !
अखेरच्या किरणांत लखलखित् तळपे तो तव भाला
तेव्हां ना जिवलगा खुणाविलें हातान मी तुजला ?
तूंहि खुणाविलें क्षण थांबूनी भाला वरती करुनी
दौडिलास मग घोडा—होत्यें बघताचि वेड्यावाणी !
मधुर मोहिनी घालुनि आतां साधिलास ना दावा ?
धीर धरूं कुठवरी ?—जिवाच्या माझ्या जिवलग जीवा !
हृदयीं तळमळ अश्रू नयनीं हुरहुर नित जीवा या
आशेवरती जीव किती हा जगवूं वद रे राया !!

भायखळा मुंबई. —विपिन विहारी

---

## " वदणारच नाहिं कशी !"

कोण रमणीच्या वल्लभानें आपल्या मधु भेटीचा वायदा
चुकाविल्यास तिन त्याजवर रुष्ट कां होऊं नये ? ]

( चालः—दासि ऐसे मानुनियां. )

गांठ पुन्हां पडल्यावरि रुसुनियां बसेन अशी
नव्हतें मज विदित बाइ पाडिल अशि मजाशी फशीं ॥ धृ०॥

सुम-माला घेउनि नव येइल मजसाठिं करीं
खोंविल जरि पुष्पगुच्छ निजकरिं मम कबरिवरी
घालि मृदु मृणालांची माला जरि हृदयावरि
वेष्टिल कर घेउनि करिं नव-पल्लव-कंकाणिं जरि
मधुर हंसत मंजु वदत निजकरिं हनु करुनि वरी
भृकुटिभंग मी तरि रति चळविणार बाइ ! नचि ॥ १ ॥

मंजु मधुर संबोधानिं संबोधिल बहु मजशीं
हंसविण्यास बहुतपरी यत्न करिल चतुर-वचीं
धरुनि करीं अंचळ मी तरि खेळत राहि कशी
अधोदृष्टि वा होउनि उखळित पदनखिं भूशीं
विनविल मग धरुनी करा " सखि करी क्षमा मजशी "
शासन हें केल्याविण वदणारच नाहिं कशी ॥ २ ॥

भायखळा, मुंबई. —विपिन--विहारी.

# दिल्‌ दानत.

( वीणा वाणी )

दिल्‌भरा ! थांब कां जासि जवें ?
ही पहा येत मी तुझ्यासवें । धृ० ।
जादु तुझ्या नयनांत भुलावण
तनूस तारण, सुखास साधन
मनास मोहन, जिवास जीवन
तें रूप तुझें हरघडी नवें
ही पहा येत मी तुझ्यासवें ॥ १ ॥

भाऊबंद या सागरिं लाटा
द्या प्राप्तीचा अर्धा वांटा
कांट्यानें तरि काढिती कांटा
त्वत्प्रेम वेगडी तसें नव्हे
ही पहा येतसें तुझ्यासवें ॥ २ ॥
या हृदयाचा राजस राणा
ही दिल् दौलत तुज नजराणा
घेऊं कशाला शपथा आणा
जें प्रेम खरें तें न सांगावें
ही पहा येतसें तुझ्यासवें ॥ ३ ॥
खूण मनाची पटे मनाला
जाणिव हृदयाची हृदयाला
देवघेव करि कोण कुणाला
जें काय होत तें न सांगवें
ही पहा येतसें तुझ्यासवें ॥ ४ ॥
क्षणभंगुर धन दौलत सारी
प्रीति जिवाची अभंग होरी
या विश्वावर सत्ताधारी
हा जिव तिच्याविण न संभवे
ही पहा येत मी तुझ्यासवें ॥ ५ ॥
पाहुनि चंद्र चकोरी हर्षे
नगा बघुनि घनघटाहि वर्षे
कमलिनि हांसे रविच्या स्पर्शें
इंगीत यांतले न सांगवें
ही पहा येत मी तुझ्यासवें ॥ ६ ॥

योग जेधवां प्रथम दर्शनीं
प्रेम बीज रुजलेंच या मानीं
पूर्ण जहालें मी तम रमणी
मन्निश्चय धात्या न भंगवे
ही पहा येतसें तुझ्यासवें ॥ ७ ॥
वनांतली ही साधी बाला
सुमन वाहिलें तुज वेल्हाळा
जीव तुला हा अर्पण केला
तार वा मार कर तुला हवें
ही पहा येत मी तुझ्यासवें ॥ ८ ॥
वाग्देवीच्या पदकमलांला
सेवित असतां हार जहाला
गात " वसंतविहार " पदाला
ते बोल घुमति कवनांत नवे
" ही पहा येत मी तुझ्यासवें " ॥ ९ ॥

७-८--२३ दादर —वसंतविहार

---

# विरहाकुल यशोधरा

[ राजकुमार सिद्धार्थ ( महात्मा गौतमबुद्ध ) यास एकाएकीं उपरती होऊन, त्यानें राज्योपभोगादि सुखें व नवप्रसव पत्नी यशोधरा हिचा परित्याग केला आणि वनवास पत्करला. विरहानें भग्नहृदय झालेल्या यशोधराचा शोक खालील पद्यांत प्रतिध्वनित करण्याचा प्रयत्न केला आहे. ]

( चंद्रकांत )

जीवितेश ! या असह्य विरहानलीं लोटुनि मजला
जाशी कसा तव कोमल हृदया द्रव नच कां आला ?

त्यजुनि अतुल नृपवैभव परिजन मातापितरेंही
शैलवास कां रुचे लोटुनी असुखिं भामिनी ही !
परिणियलें पण जिंकुनि—करुनी वीरोचित कर्म
हाय ! परिकसें प्राणेशा ! अजि भेदियलें मर्म !
दशवर्षांच्या सहवासाचें—प्रीतीलतिकेचें
केलें छेदन नाथ ! कुठाराघातें क्षणीं कैंचें ?
हृदय सदय नवनीत-मृदुल तव मजशीं अनुभूत
अदयत्व कसें वरिलें अजि मम चित्त होत भ्रांत !
क्षत्रिय हृदय रणीं " वज्राहुनि कठोर " अरि-निकरीं
प्रिय- परिकरिं " मृदुकुसुमाहुनि " ही वैखरि सत्य जरी
अनुभव याचा उलट येइ अजि सिद्धार्था आर्या !
विरहोदधिमाधि लोटिशि अवचित तव ही प्रिय भार्या
अंध पंगु रोगार्त जनां जें देखुनि मन द्रवलें
विरहशस्त्र या अबलाहृदयीं मारूं कसें सजलें ?
चढवुनि प्रत्यंचा हरिणीं शरसंधाना करितां
विरलें त्वन्मन नवनीतासम मृगयेमधिं कांता !
दीन मृगीचें—या परमप्रिय तव सहचारिणिचें
मृदुल हृदय विंधितां न सदया ! तव मन कां कांचे ?
यशोधरेचा काय वेंर या घडला अपराध ?
प्राणेशा ! हा कसला असला साधियला वाद ?
त्वत्प्रीतीची खूण दिली मज बालक मृदु-काय
जन्मतांच त्या त्याजिशी सखया ! तदपराध काय ?
नव-कुवलय-दलसम—उभयांच्या प्राणांचा प्राण
मोहुं न शकलें तव हृदया कां त्याशिशुचें वदन ?

बाळ सुकोमल दिसतें नाथा ! किति गोजिरवाणें
त्यजिलेंशि कसें अदयपणानें राजस हे चिमणें ?
मूर्तिमती त्वत्प्रतिमा दुजि ही बघुनीयां सखया !
नयनांवाटे गहिंवर वाहे हृदयींचा तेव्हां
घेउनि अंकीं अश्रुजलांनीं नित्य तया न्हाणें
कसलें आतां न्हाण माखणें ?--हें बापुडवाणें ?
भग्न--हृदय मी, गलित--धैर्य मी, विगतभान नाथा !
तत्संगोपन होइल कैसें मजकरवीं आतां ?
तव सान्निध्यीं कमलालयविभवाधिक जें हर्म्य
प्राणनाथ ! परि आजि वरी तें स्मशान-स्थलसाम्य !
प्रवेशतां त्या शयनगृहीं जे भाव मनीं उठती
कवणे परि ते कथूं प्रियकरा ! किति मनतापविती
आणिक सखया ! सोन्याचा तो मंचक--अहह किती
परोपरी मज हतभागिनिला रडावि मुक्तकंठी !
व्यथित-हृदय मी कधिं फिरतांना येतें प्रासादीं
स्फटिकसौध तो शून्य बघुनियां न्हातें अश्रुमधीं !
त्या सौधावरि बसुनि उभयिं अनुभविल्या ज्या रात्री
कंप उठति तत्स्मृति हृदयेशा ! मम गात्रोगात्रीं !
तदा चित्रपट भवितव्याचा—सुंदर आशांचा
मधु-मधुरा वचिं रंगविशी तो विसरलाशि कैसा ?
“ मी सहकार लता तूं, शशि मी राहाण तूं, आर्ये !
“ तूं मानस मी हंस, देह मी छाया तूं सखये !”
सुधा-मधुर या प्रणयवचानिं मज आश्वासुनि सखया !
विफल करिशि कां हाय ! मनीषा त्यजुनी या समया !

शोकावेगें उठुनी येतें उपवनिं मी जेव्हां
स्थानें प्रिय तव बघुनी येतें हृदय भरुनि तेव्हां
दृढालिंगनीं रतल्या लतिका प्रियकर विटपाला
हंसुनि दाविती पुष्पमिषें त्या स्वर्गीय सुखाला
प्रियतम तरु मम परि तूं जाशी त्यजुनि मज वनाला
तव हृदयाला या लतिकेचा विचार नच शिवला ?
प्रियङ्गुमालती-जातिलतादिक वनदेवी-दुहिता
सुम-संभारे खुलती त्यांना वदतें मी कांता !
" कुसुम--स्रज मज अतां गुंफणें नच नाथासाठीं "
" मज विरहिणिला अभिसारहि नच करणें या पुढती "
" इतुकेंहि तुम्हां कळावें न कां अयि फुलवंतींनों ! "
" पुष्पित व्हावें काय समयिं या व्यर्थचि सखयांनो ! "
अशोक असुनी शोक देइ तो तरु मजसीं भारी
जेथें उभयीं घालविल्या किती रात्री मोदभरीं !
लता- कुञ्ज जो नाथा ! अपुला आवडता होता
रम्यपणा लोपला तयाचा अवघा तूं जातां !
कुञ्जांतिल त्या शून्यासनिं तव हाय ! रडत बसतें
चरण--पुनित तव धूलि घेउनी वंदन मी करितें !
अलि--गुंजारव पवन--स्वन तो कर्णीं मम येई
निर्झर--विनदन कपोतनिस्वन कुञ्जवनीं होई
आणिक कोकिल--कूजित उठवी शूलचि मम भालीं
अभागिनी मी अहह ! तेधवां अश्रु किती गाळी !
शून्य--मनस्का होउनि फिरतें दिनरजनीं हाय !
जीवितसर्वस्वा ! मम झुरतें जळतें हें हृदय !!

सोडुनि दीर्घोच्छ्वासा अथवा ढळढळ मी रडतें
मूर्च्छित होउनि मधुनी मधुनी भूमिवरी पडतें !
उद्विग्न मना निद्रा गेली बहुधा सोडून
नयनें मिटतां स्वप्नें क्षणिं तीं करिति हृदय भग्न!
अनंग--सुंदर नयन--मनोहर त्यांमधिं तव मूर्ति
दिसते नाथा ! आलिंगाया करितें कर वरती !
स्वप्नचि परि तें हरहर विधि मज नैराश्यीं लोटी
निर्घृण--हृदया ! अदय विधात्या ! कपटी अससि किती ?
विमनस्का मी होउनि बसतें कधिं विगलित--भान
नाना तर्ककुतर्की होतें व्यग्र मदीय मन !
तपें, अनशनें, चंडातपनें अथवा हिमपतनें
अघोर घनवर्षणें निबिडवनिं झंझा पवनानें
मुक्तवसनतनु गिरीगव्हरीं अनवाणी फिरणें
यांहीं होइल गति कैशी तव शिव शिव ! प्रभु जाणें !
थिजवी रुधिरा जणुं निबिडवनीं भेसुर घूकरव
गर्जति हिंस्रपशू होइ तसा जंबुकरव अशिव
एकाकी त्या घोरवनीं तूं भ्रमतोशी सखया !
दग्ध करी हा अतिव घोरतर विचार मम हृदया ! !
नको विभव तें नको मानधन नकोत मज आप्त
अनुदिनिं इच्छीलें व्हावी तव पदसेवा प्राप्त
मग विपिनीं कां दासीला या नेलें नच सांग ?
धर्म--विहित हा असे काय वद ' सहधर्मिणि--त्याग ' ?
शोकावेगें हाय ! काय हें मी वदतें बाई ?
पतिदेवाला दोष लाविते पतिव्रता कांई ?

चित्तक्षोभें बोल लाविले तुज मी अज्ञपणें
क्षमा करीं या दासीला तूं सदया ! थोरमनें
तप आचरिशी तूं चित्सौख्यास्तव त्या विजनवनीं
सदनीं या मी आचरीन तप हाचि हेतु धरुनीः—
" त्रैलोक्याचा पति तुजवरि तो कृपादृष्टि ठेवो
असुख वारुनी मनेप्सितांतें सिद्धीला नेवो
चित्सौख्याचा अनुभव साचा तुजला झणिं येवो
निर्वाणाचा बोध तसा तो झडकरि तुज होवो "

चाडसूर-( सुधागंड ) —विपिन-विहारी

---

## पतिव्रता

( चालः—वधू ही वल्ली० )

उभि नभोद्वारीं । ही कोण कुणाची नारी ॥ धृ० ॥
रक्त--वदन ही दिसे घाबरी
उभी एकटी या क्षितिजावरि
होतां रविचा अस्त बिचारी
घोर अंधारीं । करि काय ? कोण कैवारी ? ॥ १ ॥
संध्यादेवी ही ! नच नारी
प्रियकर दिनकरलोपविचारीं
पतिव्रता ही झालि बावरी
घोर अंधारीं । ही रमेल मोक्षागारीं ॥ २ ॥
संध्यादेवीपथ संसारी
पतिव्रताजन मुदें आदरी

पतिलोपीं पथ हा कैवारी
घोर अंधारीं । पतिनिष्ठ वसे कां नारी ? ॥ ३ ॥
काय भयंकर पथ अविचारी !
वदाल तुम्ही स्त्री--कैवारी
मोल न या जरि कलिबाजारीं
कृतयुगाचारीं । ही समजा काव्यभरारी ॥ ४ ॥

नाडसूर. —मा. ना. आचार्य.

---

## " संकटें ही कसोटीच आहे "

( श्लोक )

खरें सत्व कोठें वसे हें पहाया ।
प्रभू धाडितो संकटें हीं, न वायां ॥
प्रभूच्या कृतीचें कळे ज्यां न गूढ ।
वृथा ते तया लाविती शब्द मूढ ॥ १ ॥
हरिश्चंद्र राजा महासत्यसंध ।
जयाचा जगीं दाटला कीर्तिगंध ॥
न त्यातें जरी गांजिता गाधिपुत्र ।
न होता जना ठाउका अल्पमात्र ॥ २ ॥
'कुठें त्वत्प्रभू ?' बोलतां, स्तंभभेद ।
करोनी स्फुरे, नीरसी भक्तखेद ॥
सुतातें जरी गांजिता ना हिरण्य ।
न होता जगा ठाउका भक्तधन्य ॥ ३ ॥
न नेता वैदेही दशमुख कुधी ओढुनि जरी ।
परस्पृष्टा ऐसें परुष वदता लोक न तरी ॥

अपूर्वा वी शुद्धी हुतवहगता कैंवि घडती ? ।
सतीत्वाचे तेजीं दृढ जनरती कैंवि जडती ? ॥ ४ ॥
जगत्स्रष्टा साक्षी अतुलबलधी राघव जरी ।
तयाची अर्धांगी दशवदन ठेवी निजकरीं ॥
तिला इच्छामात्रें क्षम मिळविण्या काय नव्हता ? ।
परी दावी लोकां, व्यसनसहता, हेचि विभुता ॥ ५ ॥

पडघवली. —म. ह. मोडक बी. ए.

# बाल्यांतील पूर्ण सौख्य

[महाकवि श्रीभवभूतीच्या " जीवत्सुतातपादेषु " याचें भाष्यरूप भाषांतर]

( चालः—सखेगे सुरेख संगम किती० )

अयोध्या वृत्तरम्य पहिलें । मनीं या मूर्तिमंत भरलें ॥ धृ० ॥
शिरिं छत्र तातपादांचें
कवच जें सर्व विपदांचें
आधान सौख्य भोगाचें
तें वृत्त सुखाचें पहिलें ॥ १ ॥
वळवुनी नयनराजीवा
दावुनी मुग्धरस--भावा
नववधू रमविती जीवा
तें वृत्त सुखाचें पाहिलें ॥ २ ॥
निरुपमा प्रीति जननींची
बिनमोल ठेव बाळांची !
ती चिंता वाहि जिवाची
तें धन्य वृत्त बा ! पहिलें ॥ ३ ॥

नं. ना. ता.

स्मृतिरूप आज तें सारें
स्थिर भावबळें परि बा ! रे !
साक्षसें उभें सामोरें
परि तथ्य तयांत न उरलें ॥ ४ ॥

नाडसूर. —मा. ना. आचार्य.

---

# पुराण पतिव्रता

पहा ती सती सुंदरी याज्ञसेनी ।*
किती प्रार्थिली आडवूनी खलांनीं ॥
न झाली परी त्यांस केव्हांहि राजी ।
म्हणोनी तिचें नांव गाजे समाजीं ॥ १ ॥
पर्यंकीं बैस, खेळूं शशिमुखि सुरता हो प्रिया पट्टराणी ।
मी तूझा दास लक्ष्मीसह, निकट उभा सेवनीं बद्धपाणी ॥
सैरंध्री कीचकें यापरि जरि विजनीं प्रार्थिली नम्रभावें ।
साध्वी नाहींच त्यातें तिळ अनुसरली, स्तोत्र तीचेंच गावें ॥ २ ॥
दरिद्र तव हे पती त्यजुनि त्यांस कंजेक्षणे ! ।
भजें मजसि ये रितीं डंवचितांचि दुःशासनें ॥
सहे न वच तें, तया डसुं बघे जशी सर्पिण ।
सती वद अशी परा वपु कधीं करी अर्पण ? ॥ ३ ॥
घाली जयद्रथ बळें धरुनी रथांत ।
होऊनि लोलुप तिशी रिझवी नितांत ॥
नाहींच त्यास तरि ती अनुकूल झाली ।
झाला तिचा म्हणुनि संकटिं कृष्ण वाली ॥ ४ ॥

---

* द्रौपदी.

पद्मावी दुजी जानकी रामपत्नी ।
दशास्यें किती प्रार्थियेली प्रयत्नीं ॥
भजेना तयातें त्यजूनी पतीला ।
पुराणीं अशा लेखिल्या सत्वशीला ॥ ५ ॥
सती ती सावित्री निजपतिस आणीत परत ।
यमाशीं भांडूनी, परि न कधिं हो अन्य--निरत ॥
पुरंध्री व्यासांनीं बहुत असती वर्णित अशा ।
स्वतेजें अद्यापी भरुनि उरल्या ज्या दशदिशा ॥ ६ ॥

आडवली. —म. ह. मोडक बी. ए.

---

## उदास हृदयाची हांक–

( चालः—म्हातारीची )

[ कवीची कवितेशिवाय दुसरी प्रिया कोण असणार बरें ! ]

कोठें तूं असशी प्रिये गे ! भेट न कां देशी ।
शोधुं कुठें तुजला शोधुनी जीव किती दमला ।
विचारिलें न तुला म्हणुनि कां रागचि हा आला ? ।
येउनि भेट मला कधींही विसंबे न तुजला ।
अंत किती बघसी अजुनि कां दया न ये तुजशीं ।
काय करूं मी गे !
साजणी ! म्हणजे येशिल गे !

* * *

"तुझ्या प्रीतिकरितां" ठेविन चरणांवरी माथा ।
"तुझ्या प्रीतिकरितां" सुखें मी त्यजीन ही जनता ।
"तुझ्या प्रीतिकरितां' सुखानें सोडिन या जगता ।

"तुझ्या प्रीतिकरितां"
प्रिये गे ! करूं काय आतां ! ! !

* * *

दर्शन दुर्लभ जें सखे ! तें झडकरि दे मातें ।
दर्शन जरि न घडे—अतांची, बघशी मग इकडे ।
दिसेल काय तुला ? कधींही न कळे जें मजला ।
अशी स्थिती माझी पाहुनी होशिल कां राजी ? ।
जरी न तूं येशी बागही कशास गे ! मजशीं ।
जरी न तूं येशी वाहुं मी पुष्पें कोणाशीं ।
जरी न तूं येशी
काळ हा कंठूं कवणाशीं ! ! !

* * *

तूं जर येशील जगत् जड कधिंहि न वाटेल ।
दिसेल मग मजला धरेवरि स्वर्गचि अवतरला ।
तें मम सुख बघुनी खेद ते करितिल देव, मुनी ।
करिशी जर प्रीती सखे गे ! धन्यचि मी जगतीं ।
कधिंहि न कोणाला
भाग्य तें लाभेलचि मजला.

* * *

तुझ्या स्वागतार्थ सुंदरी ! करीन मी शर्थ ।
शर्थेचि जी केली पाहुनी हंसशिल तूं गालीं ।
म्हणुनी विनवीतों प्रेमले ! प्रेमें आदरितों ।
ये ! ये ! हृदय फुले
करूं जग क्रीडांगण अपुलें.

* * *

खांबावांचोनी भिडविला मंडप हा गगनीं ।
(आधारचि प्रीती त्याजला एकचि तो म्हणती !)
पसरिन गालीचा भूवरी हिरव्या गवताचा ।
सुंदरशीं मोतीं बिंदु दंव टाकिन त्यावरतीं ।
निळया छतावरि या लाविलें हंड्या झुंबरांना ।
धरिलीं रंभांनीं तोरणें डुलतीं जणुं गगनीं ।
वाजवि मेघांचा चौघडा गभीर केव्हांचा ।
दर्शन तव घ्याया सारखी चमके ही माया ।
मोहक तेजाचा लाविला ध्वज तो चंद्राचा ।
उषा सुंदरीचा उधळिन गुलाल अरुणाचा ।
संध्या रंगाचा
सडा गे ! शिंपिन प्रेमाचा.

* * *

या वन--वनितांचा नाच मी करविन प्रेमाचा ।
अति कोमलतेचा हरितिं जीं गर्वचि मदनाचा ।
त्या मृदु सुमनांचा पथचि गे ! करीन प्रीतीचा ।
प्रीतीचें गाणें गावया लाविन हौसेनें ।
खगगण ते गाती तान जणुं गंधर्वचि घेती ।
पाही गीताला ताल ती धरि सरिता--बाला ।
पिंगा तालाचा त्यावरी चाले वायूचा ।
झणीं धांव घेई सखे गे ! पवन निघुनि जाई ।
वाऱ्यावरि बसुनी जाउं ये दिव्य अशा गगनीं ।
तुझिया प्रेमानें
शोधिन लपलीं जीं भुवनें.

* * *

भेटशि जर मजला   साजणी ! सांगूं ! काय तुला ।
तुझें वर्तमान   त्रिभुवनीं कळविन जाऊन ।
गाणीं गाऊन   सकल या जगा जागवीन ।
जगता हलवून   सुखानें त्यांतचि डोलेन ।
जिवंत जगवीन   आणखी मेले उठवीन ।
नलगे पाण्याचा   प्रळय; मी करीन प्रेमाचा ।
जगता बुडवीन   यमाला मागें फिरवीन ।
गाइन तें गाणें   येइल काळासचि मरणें ।
सुर, नर भुलवीन   सारखीं गाणीं गाऊन ।
गाणीं गाऊन   अखिल ब्रह्मांड डोलवीन ।
शेषा डुलवीन   हरीची मुरलि वाजवून ।
निद्रा टाकून   बावरा बघेल भगवान ।
तारा जमवीन   भोंवतीं तुझ्या खेळवीन ।
सारें सोडून
असा मी तुला आळवीन.

* * *

परंतु तुजवीना   मानिन तुच्छचि लीलांना ।
उदास 'वनराजा'   तुजविना; प्राणचि तूं माझा ।
अंत नको पाहूं !   प्रिये ! हा विरह कसा साहूं ! ।
येऊं दे कींव
हे सखे ! दासा वांचीव !

* * *

दादर–मुंबई.   ––वनराज.

# सौंदर्याचा प्रभाव

सौंदर्य ही दिव्य अमोघ शक्ति ।
सर्वत्र ऐसें कवि बोलताती ॥
अचाट गोष्टी करिते जगांत ।
पहा विचारूनि खरें मनांत ॥ १ ॥
चांचल्य मंदा धिषणा जडाला ।
दे, लंघवी पर्वतही लुल्याला ॥
पशू नराचा, नरही पशूचा ।
करी असा अद्भुत खेळ तीचा ॥ २ ॥
वृद्धास दे यौवन दृष्टिमात्रें ।
निर्जीव तीं पुष्ट करीत गात्रें ॥
विराम पाडीतहि क्षुट्-तृषेचा ।
मूकास दे वाक्पतितुल्य वाचा ॥ ३ ॥

पडघवली. —म. ह. मोडक बी. ए.

---

# एकांतांतील खूण

[ प्रत्यादिष्ट शकुंतला दुष्यंत राजाला एकांतांतील खूण सांगत आहे. ]

( वसंततिलका )

एके दिनीं प्रणय-केलि-मिषें वनांत
बैसोनि जाति-लतिका-नव-मंडपांत
ठेवोनियां हृदयिं मस्तक आपुल्या या
प्रेमें प्रसन्न गुजगोष्टि कितीक केल्या ॥ १ ॥

आला अशांत मम आवडता हरीण
स्थीरावला मजशि तेथ तशी बघून
पाचारिलें निकटिं आपण त्या स्वहस्तें
ना येइ-कीं सुचवि चंचल-नेत्र-पात ॥ २ ॥
आलें मनांत अपुल्या मग कायसेसें
मी पाहिलेंहि वदना अपुल्या सुहासें
द्रोण स्वहस्तिं करुनी नलिनीदलांचा
तो घेतला भरुनि वारि करीं स्वतांच्या ॥ ३ ॥
त्यातें करोनि पुढती मृग-पोतकाला
पाचारिलें पुनरपी जल सेविण्याला
ना येच तो, हंसत मी मग हातिं द्रोण
घेतांच, येउनि जवें जल घे पिऊन ॥ ४ ॥
पाहोनियां मजकडे पुरु-नाथ! तूर्ण
ऐकीवली वच-सुधा परिहास-पूर्ण
*"विश्वासिती जगिं सजातिय एकमेकीं
दोघेंहि तुम्हि वसणारिं वनांतलीं कीं!" ॥ ५ ॥

भायखळा, मुंबई. —विपिन-विहारी.

---

# आहे कां वशिला कांहीं ?

दशदिशांतुनी ध्वनि येई । आहे कां वशिला कांहीं ? ॥ धृ० ॥
नृपवंशीं जन्म तुला मी । देईन सुखाच्या धामीं ।
दावुनी वस्तु नव नामी । ठेवीन ऐष आरामीं ।

---

* सर्वः सगन्धेषु विश्वसिति —अभिज्ञानशाकुंतले श्रीकालिदास

सिंहासनिं तुज बसवीन
शिरिं मुकुट रुचिर चढवीन
करिं राजदंड धरवीन
परि जीवा ! निज कर्माचा । आहे कां वशिला कांहीं ? ॥ १ ॥
भूगोल घोकिला सारा । इतिहास पाठही झाला ।
व्याकरणीं पोपट बोले । भाषेंत हात गगनाला ।
पारंगत भूमिति गणितीं । इतरांची भीति कुणाला ।
उत्तीर्ण परीक्षेमाजी
व्हावया झटसि तूं आजी
राजीवा परि बहु राजी
परि विद्यार्थी ! हें पाही । आहे कां वशिला कांहीं ? ॥ २ ॥
पदव्यांचें शेंपुट मागें ! परि तरुण नोकरीमागें ।
हातांत अर्ज घेओनी । नोकरिची भिक्षा मागे ।
शहराच्या चौकामाजी । तरुणाची दाद न लागे ।
नव अर्ज लिहोनी घेई
तो इतस्ततः भटकेही
नोकरी मिळे न कुठेंही
हा प्रश्न एक तरुणाला । आहे कां वशिला कांहीं ? ॥ ३ ॥
कधिं सुनमुख येई गेहीं । ही मातापितरां आशा ।
कधिं झडे चौघडा दारीं । कधिं गर्जे ग्रामीं ताशा ।
कधिं विवाह होईल माझा । तरुणाला हीच पिपासा ।
बायको मिळावी छान
संसारीं मित्रसमान
समगुणी समवयोमान
परि तरुणा ! मध्यस्थीचा । आहे कां वशिला कांहीं ? ॥ ४ ॥

बहुगुणी तरुण जे कांहीं । गुणवंत तरुण तो त्यांत ।
तो जाडा लेखक होई । आकांक्षा त्या चित्तांत ।
झळकावे लेख सदाही । नामांकित मासिक त्यांत ।
गोष्टींनीं व्याप्त कपाट
दप्तरीं नाटकें आठ
करि यत्नहि आटोकाट
संपादकवृंदीं तरुणा ! आहे कां वशिला कांहीं ? ॥ ५ ॥

पाहुनी शहर गुलजार । मायपोट तें सर्वांचें ।
घेउनियां राणीसंगें । तरुण ये गृहीं मित्राचे ।
मनिं हेतु शोधुनी जागा । थाटुं या बिऱ्हाड मजेचें ।
पालथ्या घातल्या चाळी
ही आळी मग ती आळी
भटकेही वेळिं अवेळीं
हा प्रश्न एक कोठेंही । आहे कां वशिला कांहीं ? ॥ ६ ॥

माहेरीं असतां कांता । ये " आश्रम " भोजन दैवीं ।
मग चाखत माखत थोडें । नसतांना इच्छा जेवी ।
" आश्रमीं " काळजी कसली ? । लष्करी हुकुम हो जेवीं ।
घरच्या परि शांतपणानें
तें नाजुक साजुक खाणें
सुखकरसें भोजन होणें
हें मिळेल तुज परि तरुणा ! । आहे कां वशिला कांहीं ? ॥७॥

वशिल्याचे धागेदोरे । लांबविण्या हौस मनाला ।
परि मर्यादे बाहेर । अग्राह्य विषय रसिकाला ।
पटतां हें तत्त्व मतीला । पट आंखुडता हा झाला ।

परि पुन्हां छेडुनी तार
सानंद " वसंतविहार "
सुचवीत जनां साधार
प्रभुपदार्थ संत जनांचा । आहे कां वशिला कांहीं ? ॥ ८ ॥

१५--९--२४, दादर. —वसंतविहार.

---

## एका कामुकानें केलेलें स्त्रीरूपाचें वर्णन.

काय ही मधुरता वदनाची । भ्रांति देत कमला-सदनाची ॥
केसरोपम छवी वदनाची । ही पताक विजयी मदनाची ॥ १ ॥
केश कृष्ण, कुरळे घनदाट । भ्रूवरी रुळति झांकुनि पाठ ॥
वेणिचा नवल हा किति घाट । वर्णण्या क्षम न नूतन भाट ॥ २ ॥
हा ! विशाल किति हें तरि भाल । फुल्ल, गौर, मृदु हे किति गाल ॥
ओष्ठपल्लव रसालहि लाल । धन्य दंश करितो हरिलाल* ॥ ३ ॥
दीर्घ आश्रुति, सुपक्ष्मल, काळे । शांत, सुप्रभ, समंजस डोळे ॥
स्मरतार अनुवार हालती । खोलती हृदय, काय बोलती ॥ ४ ॥
भ्रूकुटी कुटिल हे करवाल । खंडचाप धरि कीं स्मरबाल ॥
नेत्रदीपभव-कज्जल-रेखा । भालपट्ट खुलवी बहुदेखा ॥ ५ ॥
ईषदावलित उन्नतनासा । ही धरीत शुकचंचुविलासा ॥
जेवणी चिमुकली रसधानी । हो सहाय अधरामृतपानीं ॥ ६ ॥
दीर्घ, मांसल, सुकोमल बाहू । बाजुबंद शकती नच साहूं ॥
गोड गोंडस किती तरि हात । चुंबनास मन उत्सुक होत ॥ ७ ॥
गेंदुकद्वय उरीं ठसावलें । कोकयुग्म अथवा विसावलें ॥
यौवनामृत हृदीं न मावलें । तें भरूनि कुचकुंभ ठेविले ॥ ८ ॥

---

* हरीचा लाल—देवाचा लाडका—

भासते अनुदरा ललना ही । मध्यभाग तर दृश्यच नाहीं ॥
मात्र हा जघन–गौरवधारी । हस्तिकुंभ--युग आणित हारी ॥ ९ ॥
गाभ सोलित्र जसे कदलीचे । ऊरु शीतळ तसे तरुणीचे ॥
गूढ जानु बहु गुल्फहि तेवी । किन्नरी न नरि हे, परि देवी ॥ १० ॥
सौकुमार्य गतिचें किति वानूं । हालती न पथिंचे परमाणू ॥
पाउलें कमलशीं मृदुलाल । प्राणहंस मम चुंबनलोल ॥ ११ ॥
हा गुलाब खुलला बहु गालीं । पंकजेंच नयनीं स्थित झालीं ॥
दाडिमीसुम बघा अधरीं तें । नासिका तिलसुमत्व धरी ते ॥ १२ ॥
हस्तपाद मृदुपल्लव होती । चक्रवाक कुच हे गमताती ॥
नूपुरें मुखर हे +कलविंक । मन्मथोपवन हें गतशंक ॥ १३ ॥

पडघवली. —म. ह. मोडक बी. ए.

---

## त्याच साध्वी रूपवतीस पाहून एका सभ्य रसिकाचे उद्गार

पुष्प पूर्ण फुललें कमळाचें । जाल ज्यावरि रवी किरणांचें ॥
ल्हादकत्व लसती वदनाचें । दावितें, मज गमे, परि कांचें ॥ १ ॥
म्लान जीवकुसुमा विकासवी । मर्त्यभू सुरपदाभ भासवी ॥
दीपवी, परि न लेश तापवी । हें सतीवदन चंद्र ना रवी ॥ २ ॥
आमोद जो वर्णिति नंदनींचा । तो या मुखीं भारतनंदिनीच्या* ॥
दे सद्य सर्वेंद्रियतर्पणातें । नैर्मल्य तें लाजवि दर्पणातें ॥ ३ ॥
आधींच हें रूप मनोज्ञ हीचें । थाटेवरी तेज पतिव्रतेचें ॥
हेमावरी मौक्तिक ढाळ देतें । तें वर्णणें शक्य महाकवीतें ॥ ४ ॥

---

+ चटक. * भरतभूमीला आनंद देणारी साध्वी.

जिच्या दर्शनीं मावळे दुष्टबुद्धी ।
जिच्या कीर्तनें होय पापास शुद्धी ॥
जिचा पावन स्पर्श गंगाहि लक्षी ।
कुलोद्धारिणी हे सती सारसाक्षी ॥ ५ ॥

पडघवली. —म. ह. मोडक बी. ए.

---

# सुखकर सहवास !

सुखकर किति सहवास
सखे ! तव सुखकर किति सहवास ॥ धृ० ॥
चिंता कसली तव सान्निध्यीं
लवहि शिवे न जिवास । सखे ! तव० ॥ १ ॥
आधि, व्याधी आणि उपाधि
जाती सर्व लयास । सखे ! तव० ॥ २ ॥
दुःख, निराशा विलया जाउनी
थयथय करि उल्हास । सखे ! तव० ॥ ३ ॥
तव सन्निध जें सुख मज मिळतें
तें न मिळें इतरांस । सखे ! तव० ॥ ४ ॥
मानवि वैभव नको नको तें
विटलों बघुनि तयांस । सखे ! तव० ॥ ५ ॥
गृह, सुत, दारा व्यर्थ पसारा
पटवूं या बोधास । सखे ! तव० ॥ ६ ॥
'शांति-निकेतन' कुणा न गवसें
दाखवुं चल जगतास । सखे ! तव० ॥ ७ ॥
[ मूर्तिमंत तूं 'शांति-देवता'
कां नुमजे ! मनुजांस । सखे ! तव० ] ॥ ८ ॥

व्यास, वाल्मिकी रमले; पाहुनि—
मोहक तव रूपास । सखे ! तव० ॥ ९ ॥
वागेश्वरि गे ! लुब्ध तुजवरी
झाला कालीदास । सखे ! तव० ॥ १० ॥
केवळ ते तव कृपा–प्रसादें
मिळविति 'अढळपदा'स । सखे ! तव० ॥ ११ ॥
'बालरूप'* तव मोहवि कैसें
थक्क करी सकलांस । सखे ! तव० ॥ १२ ॥
धन्य ! धन्य ! मी म्हणुनी वाटें
घडला तव सहवास । सखे ! तव० ॥ १३ ॥
तव सहवासीं राहुनि संतत
गाइन संगीतास । सखे ! तव० ॥ १४ ॥
'मी-तूं' सारें त्यजुनी आतां
सेवूं अद्वैतास । सखे ! तव० ॥ १५ ॥
'मी पण' माझें नष्ट होउनी
चढलों दिव्य पदास । सखे ! तव० ॥ १६ ॥
मधुतर सृष्टी दिसतां नयनां
पार न आनंदास सखे ! तव० ॥ १७ ॥
आनंदानें गुंगत गुंगत
जाऊं निजधामास । सखे ! तव० ॥ १८ ॥
'वनराज' विनवि नलगे कांहीं
'अक्षय दे पदिं वास' । सखे ! तव० ॥ १९ ॥

दादर–मुंबई. —वनराज.

---

* महाराष्ट्र वाङ्मय भक्तांस ज्यानें आपल्या वयाच्या अवघ्या तेराव्या वर्षी मोहून टाकिलें तो 'बालकवि' वागेश्वरीचें तें बालरूप नाहीं असें कोण म्हणेल ?

# कर्मविराग

[ पृथ्वीवृत्त ]

विभो ! विषयवासना भुलविते सदा या मना
न जेथ नवसंग्रहीं रति नवी असा याम ना
मना सतत आवरी तरिहि वृत्ति हे बावरी
न शांतिलव संभ्रमीं सुरत चित्त हें बा ! वरी ॥ १ ॥
अगा कलिमलांतका ? मजसि पाववी पावना
दयाब्द ! झणिं तोडि या अमल वासनेच्या वना
तुझें चरित चिंतितां यश तुझेंचि गातां रमो
भ्रमो न मन हें हिताहित दुजें न यातें गमो ॥ २ ॥
सुखार्थ बहु धांवलों सतत या जनां मागुनी
प्रवृत्तिपर हें सख्या ! सकल सार्थसें मानुनी
पुरे मनिंचि एक तोंचि दुसरी उभी वासना
सुसंधि न विचिंतण्या तुज हृदिस्थ नारायणा ॥ ३ ॥
करूनि मन शांत जें उपजवी रति त्वत्पदीं
सुकर्म मज देइ तें तरवि भव्य माया नदी
उगा फसवुनी जनां म्हणुनि कर्मयोगी असें
अधःपतन--साधनीं गुरुवरा ! न ठेवा कसें ॥ ४ ॥
न यापरि विनिंदि मी विमल कर्मयोगां गुरो
महर्षि वचनीं अविश्वसित लेशही तें नुरो
सदंभ परि बोधि जो करुनि वल्गना वाउगी
तयाप्रति विनिंदित । न म्हणशील "राहे उगी" ॥ ५ ॥
न शास्त्रहित कर्म तें जरि घडे घडो ना मुळीं
रचोनि फल काय तें जरि न देवता राउळीं

मना रुचति तीं--फलीं रति धरोनि--कर्में करी
अशा प्रकट दांभिका वद न कोण तो धिक्करी ? ॥ ६

जनीं वसतसे जनार्दन असें महत्तत्त्व तें
पुढें करुनि भाविकां फसवुनी हिता साधिते
अनंत नटले परोपकृति कर्मयोगी भले
चमत्कृति मना अशी कलिकृता न ती आकळे ॥ ७ ॥

न बोलुनि करी परोपकृति-दान दे गुप्त तो
स्वयें सहज आचरोनि इतरांस संबोधितो
न लेख लिहिणें पडे स्थल न वल्गनेला उगी
गमे मज सुधन्य तो विमल कर्मयोगी जगीं ॥ ८ ॥

उगा विविध कल्पना रचुनि गद्यपद्यादिकीं
सुबोध करण्या जना जपुनि नित्य त्यातें विकी
असा म्हणवि शब्दयोगिगण कर्मयोगी असें
अकर्मयुगिं या विभो ! सुकृतसें घडेना कसें ॥ ९ ॥

असो सहज बोललों विशदवस्तुतत्त्वार्थ हा
गणो लघु म्हणोनि यास कुणि कोणि किंवा महा
सुनिर्मल तुझ्या तिरस्कृतसुपंकजांघ्री-विणें
कदा नच वृथा घडो गुरुवरा ! दुजें सेवणें ॥ १० ॥

विभिन्न रुचिकारणें गमति धर्म हे भिन्नसे
समस्त परि मानिती पद तुझेंचि तें साध्यसें
पदीं निरुपमीं तुझ्या मति म्हणोनि ही राहतां
अनंतपथतत्त्व तें सहज ये करीं तत्वतां ॥ ११ ॥

नाडसूर, —म. ना. आचार्य

# स्वातंत्र्य–संगीत

" ब्रीद आपुलें रक्षि महाराष्ट्रा !"

स्वातंत्र्य प्रिय पवित्र देशा ! महाराष्ट्र देशा !
ब्रीद आपुलें रक्षि समयिं या मंगल मय देशा !
धर्मासाठीं मानासाठीं स्वातंत्र्यासाठीं
जिवापाड झुंजशी गाजते हीच तुझी ख्याति !
अधीं मांडिलें असुर वृत्तिचें--मोंगलशाहीनें
नंगें नर्तन भारत भूवर--अधर्म अनयानें
नवस्फूर्तिंची मर्दपणाची मंगलमय वाणी
अमृताची जणुं सरित् स्रवविली समर्थ गुरुजींनीं
त्याच सुधेचे घुटके सेवुनि श्रीशिवरायानें
वैभव--गिरि--शिरिं तुला चढविलें उमद्या मानानें !
त्या वीराचा--सख्या ! तुझ्या रे पंची प्याऱ्याचा
भगवा झेंडा फडफडला तवशिरिं स्वातंत्र्याचा !
नवखंडींही त्या झेंड्यानें मर्दुमकी केली
उज्वलतम या तुझ्या कीर्तिला अखंडता दिधली !
प्रभुबाजीच्या तानाजीच्या मुरारिच्या देशा !
दगडाच्या निधड्या छातीच्या वीरांच्या देशा !
इतिहासाचीं पानें खुलतीं सुवर्णाक्षरांनीं
वाच वाच तीं सख्या ! आजि रे उघड्या नयनांनीं
किल्ले सत्तावीस गाति ज्या, आणि, अजुनि पाहे
बारा मावळ दरीदरींतुनि घुमवित ज्या आहे
सख्या ! देउनि कान ऐक त्या घुमत्या आदेशा
" ब्रीद आपुलें रक्षी अक्षय महाराष्ट्र देशा ! "

* * * *

स्वातंत्र्याच्या संगीताच्या स्वैर लकेऱ्यांनीं
नवजीवन संचरिलें ज्यानें या हिंदिस्थानीं
शतकांतिल या स्वातंत्र्याचा पहिला चंडोल
महाभाग तो 'टिळक' शोभवी तुझेंच हें भाल !
सह्याद्रीच्या शिरावरुनि ध्वनि त्या चंडोलाचा
घुमला दशदिशिं "ऊठ भारता सिंहाच्या बच्चा !
स्वराज्य नसतें मिळत कधींही कुणि देतिल म्हणुनी
घ्यायाचें तें स्वयेंचि असतें बा ! कंबर कसुनी !"
आसेतुहिमाद्री ही घुमली वाणी गंभीर
अफाट लाटा उसळित वातावरणांत स्वैर !
नसा नसांतुनि राष्ट्राच्या अजि ओज उचंबळलें !
मातृ भूमिची बूज कराया कितिक वीर सजले !
स्वातंत्र्याचें निशाण निरवुनि गांधींच्या हातीं
गेला पुण्यश्लोक तो जरी तुज सोडुनि वरतीं
तद्वाणींतुनि निघत ऐक हा ध्वनि स्पष्ट घुमता
"प्राणाधिक तें ब्रीद आपुलें रक्षि महाराष्ट्र !"

भायखळा, मुंबई. —विपिन-विहारी.

---

# कोजागर

ते शिलेदार शौर्याचे । भालाइत खंदे वीर
मावळचे शूर मराठे । भात्यांतुनि सुटले तीर
रिपुवरती घालिति घाले । पळभर ही ज्या न उशीर
स्वातंत्र्य मिळविण्यासाठीं
बंधनें तोडण्यासाठीं

## हिंदुत्व रक्षणासाठीं

ज्यांनी 'हर हर' नभिं दुमदुमला । कोजागर तेव्हां झाला ॥ १ ॥
जन्मले क्षात्रवंशीं ते । लखलखती व्योमीं तारे
पाहुनी पौरुषा ज्यांच्या । भय कंपित मोंगल सारे
रण--देवी अंगीं खेळे । बादल बिजलीच थरारे
मी हिंदु हिंदु ते माझे
हे मोंगल कुठले राजे
कां अंमल यांचा गाजे
जाणीव होय राष्ट्राला । कोजागर तेव्हां झाला ॥ २ ॥
स्वान्यांस कधींही नव्हत्या । त्या सुप्त हिंदु समशेरी
स्वप्नांतहि दचकत होते । हिंदूंस पाहुनी वैरी
हिंदूंचा हाच दरारा । ऐकविती समरीं भेरी
रिपु मोंगल गर्व हराया
गो--ब्रह्मवृंद ताराया
धर्माचा ध्वज उभवाया
जागती स्वकर्तव्याला । कोजागर तेव्हां झाला ॥ ३ ॥
धर्माब जागृती होती । वीरांत जागती ज्योति
संतांची एकच वृत्ति । राष्ट्राची मंगल मुक्ति
नारींच्या हृदयीं मूर्ति । स्वातंत्र्य सौख्यदा प्रीति
बाळेंही स्वातंत्र्यार्थ
खेळती युद्ध खेळांत
धर्माची स्फूर्ति जयांत
ये स्फुरण महाराष्ट्राला । कोजागर तेव्हां झाला ॥ ४ ॥
"हर हर" या रणघोषानें । दिङ्मंडल जागत होतें
"हर हर" या जयघोषानें । नर केसरि गर्जत होते

"हर हर" या शुभमंत्रानें । गिरि दुर्गहि पूत अहो वे
"हर हर" हें जीवनसार
"हर हर" हा राष्ट्राधार
गातसे "वसंतविहार"
ये स्फुरण हिंदु हिंदूला । कोजागर तेव्हां झाला ॥ ५ ॥

९--१०--२४, दादर. —वसंतविहार.

---

## अवस्था-त्रय.

[ अभंग ]

विसरुनि तुज । धांवे रानभरीं ॥ विषयाचे भरीं । वासुदेवा ! ॥ १ ॥
अनेक कल्पना । भ्रमवीति मना ॥ अंत आकळेना । संसृतीचा ॥२॥
संसृतीचें सुख । सारे पराधीन ॥ भोग्यवस्तूविण । शून्य सारें ॥३॥
अनुभवितां हें । बसलों उदास ॥ तुझ्या पायीं आस । लावुनीयां ॥४॥
दास म्हणे आतां । न करी उशीर ॥ भेट दे सत्वर । स्वामिराया ॥५॥

( २ )

तुझ्या शोधासाठीं । फिरे जगभरीं ॥ सुभव्य मंदिरीं । धुंडाळिला ॥१॥
महानदी तीर । पवित्र म्हणोनी ॥ लागलों जपोनी । शोधावया ॥ २ ॥
एकांत आवडे । तुज हें जाणोनी ॥ पहिलें फिरूनी । रानि वनीं ॥३॥
परि न अगम्या ! । ठाव तुझा लागे ॥ आतां धांव वेगें । स्वामिराया॥४॥
दास म्हणे अंत । पाहुं नको आतां ॥ पामर मी नाथा । शिणलोंसें॥५॥

( ३ )

मग तो कृपाळू । जगताचा धनी ॥ प्रगट होऊनी । वदे स्वामी ॥ १ ॥
शिणलासि ऐसा । कासयासि बारे ! ॥ जडाच्या वेव्हारें । मजसाठीं ?॥२॥
नसे काय मी हा । तुझा तूजपाशीं ॥ म्हणोनी धांवशी । रानभरीं ?॥३॥

शोधूनि राजसा । पाहे क्षणभरीं ॥ तुझ्याच अंतरीं । भरलों मी ॥४॥
सद्गुरुवचें या । भ्रम झाला दूर ॥ दिसे निरंतर । दत्तराजा ! ॥ ५ ॥
दास म्हणे भेटे ! जिवाचा हा जीव ॥ आतां धांवाधांव । कासया ती ?॥६॥

नाडसूर. —मा. ना. आचार्य.

## फूल पाखरूं !

[ चालः—भला जन्म हा तुला० ]

बहुविधरूपी फूलपाखरां ! उडशी कां दुरवरी ?
राजसा ! भिऊं नको अंतरीं ।
चित्रविचित्र प्रभेसि तुझिया देखुनि मी मोहिलों
अखिलही भानासी हरपलों ।
मागें मागें मोहवुनी मज वद कैसा फिरविशी
ओढुनी चित्त कसें घेशी !
बघतां बघतां दृष्टिआड तूं उडुनी जाशी त्वरें
तयीं मम चित्त होइ बावरें ।
चपलेसम तव चपल धांव ती सोडुनियां तरुवरी
विसांवा घे रे ये क्षणभरी ।
या मधु-कुसुमामधील सखया ! मधूरशा मधु-रसा
प्राशि रे ! निर्भय तूं राजसा ! ।
बैस जिवाच्या जिवा ! जिवलगा ! लव या सुमनावरी
किती तुज निक्षुनि सांगूं तरी ।
डोळे भरुनी प्रेमभरानें पाहूं दे सुंदरा
करूं दे शांत चित्त मम जरा ॥ १ ॥

पुणें. —कृष्ण सुमंत.

# लतिका—लीला.

[ एका उद्यानांतील सुंदरशा वृक्षाला टेंकून, वाऱ्याच्या झुळुकेबरोबर नाचणाऱ्या सुकुमार वेलीवरील नाजूक फूल आपल्या सवंगड्यांशीं रमलेलें पाहून कोणा रसिक हृदयाला मोह पडणार नाहीं! ]

कोण असें
हलत असे?
वायूसंगें डोलतसे ॥ १ ॥

पाहि झणिं
निरखोनी
तें आलें जें मज कळुनी ॥ २ ॥

तें सारें
कथितों रे
आनंदानें तुज बा रे! ॥ ३ ॥

सुंदरता
ती बघतां
भूल कशी न पडे चित्ता? ॥४॥

हौसेनें
प्रेमानें
पाहुं लागलों एकमनें ॥ ५ ॥

तों युवती
सभोंवती
पाहे कां वाटे भीती! ॥ ६ ॥

कुणि न दिसे
बघत असें
प्रेमें नाथा कवळितसे ॥ ७ ॥

प्रियकर तो
किती खुलतो!
प्रेमानें तिजला म्हणतो ॥ ८ ॥

"घेच गडे!
बाळ कडे
दृष्टि वेधुं दे तुझ्याकडे" ॥ ९ ॥

कशि हंसते
परि घेत
वरुनी लज्जा दाखविते ॥ १० ॥

'कटिं तान्हा
जणुं राणा
गोकुळिंचा शोभे कान्हा' ॥११॥

सौंदर्या
माधुर्या
कमाल करि विधि चातुर्या ॥१२॥

डोलोनी
रमवोनी
पाही 'मित्रा'* हांसोनी ॥ १३ ॥

---

* सूर्याला.

सदैव तें
किति हंसतें
कोण तयाशीं गुणगुणतें ? ॥१४॥

* * *

' मधुबाल्या '
त्या आल्या
साजणि बाळाशीं रमल्या ॥१५॥

चुंबोनी
प्रीतीनें
गुंगत फिरती मौजेनें ॥ १६ ॥

* * *

प्रेमभरें
पळति त्वरें
'मधुकर' कोठें जाति बरें ?॥१७॥

मधु त्याची
ती साची
कीर्ति ऐकुनी बाळाची ॥ १८ ॥

'मधुकर' जे
ते येती
गुड्गुड करुनी बागडती ॥१९॥

तेजाला
कीर्तीला
पाहुनि हरिती भानाला ॥ २० ॥

मग कळलें
( ना वळलें ! )
'मधुकर' ऐसें कां चळले ॥२१॥

* * *

वायू हा
येइ पहा
चुंबानिं खुलतो किती अहा! ॥२२॥

तो सांगे
या अंगें
धांवत यारे मजसंगें ॥ २३ ॥

दाखवितों
बालक तो
गंधें मजला भुलवीतो ॥ २४ ॥

बाळाचा
प्रेमाचा
सौख्याचा, आनंदाचा ॥ २५ ॥

चुंबा तो
मुखिं वसतो
म्हणुनि तुम्हांला भुलवीतो ॥२६॥

तर जा रे
तुम्हि सारे
धांवुनि चुंबा मोदभरें ॥ २७ ॥

या या या
खेळाया
खेळुनि खेळवुं जगता या ॥२८॥

बालक तें
बोलविते
'खेळगडी' बघुनी मोदें ॥ २९ ॥
अति त्वरी
हर्षभरीं
'सवगडि' धांवति कितीतरी॥३०॥
'खेळगडी'
घेति उडीं
मारिति प्रेमाब्धींत बुडी ॥ ३१ ॥
आनंदें
स्वच्छंदें
खेळति होउनि धुंद मदें ॥ ३२ ॥

*   *   *

पाहोनी
तीं तान्हीं
येती प्रेमाश्रू नयनीं ॥ ३३ ॥
प्रेमभरी
नर-नारी
देवा म्हणती–'जन्मभरी–॥३४॥
सदैव तें
पाहूं दे
ना तरि आम्हां जाऊं दे' ॥३५॥
'वन--राजा' !
तूं राजा !
कल्पित असती तूं राजा !॥३६॥
किती अहा !
खुले पहा !
निसर्ग--बालक 'राजा' हा ॥३७॥
प्रीति गढे !
चुंबु गडे !
हर्ष उधळुं ये चहूंकडे ॥ ३८ ॥

दादर–मुंबई. —वनराज.

---

# मोहन-मुरली

दिशा निवळल्या, धवल जहाल्या तिमिर-पटल हटलें ।
पूर्व दिशेला बाल-भानुचें रम्य बिंब आलें ॥ १ ॥
सुवर्णमय रविकिरण पसरले, शोभा अवतरली ।
हर्ष-निर्भरा विपिन-देवता जणूं काय झाली ॥ २ ॥
गाउं लागले गान-कुशल खग विश्वोद्यानांत ।
दिनमणिला आळविती गाउनि ते मंगल-पाठ ॥ ३ ॥

हंसूं लागले तरुवर; कुसुमें हर्षोत्कट झालीं ।
समीर, निर्झर हंसूं लागले, भू हर्षित झाली ॥ ४ ॥
गंधें दरवळल्या कुंजांतरिं प्रेमें भृंग-तति ।
कळ्याकळ्यांवरि गुंजन करुनी विहरे स्वैरगति ॥ ५ ॥
करिति सडा-संमार्जन रेखिति रांगोळ्या युवती ।
गोपी दोहन करिती, बल्लव धेनु विपिनिं नेती ॥ ६ ॥
ऐशा मंगल-समयिं गोपिका कटिं घट घेवोनी ।
पवित्र यमुना-जळा चालली हृदयीं उल्हसुनी ॥ ७ ॥
मनोहारिणी मृगनयना ती हरित वसन ल्याली ।
कुंतल काळे कुरळ शोभती भृंगासम भालीं ॥ ८ ॥
बहराला नव-यौवन आलें गती मंद झाली ।
लावण्याची ललित-लता जणुं रतीच अवतरली ॥ ९ ॥
सृष्टि-लतेची सुलोल कलिका सौंदर्यें फुलली ।
चंचल चपलेची जणुं नेत्रीं चमक दिसे भरली ॥ १० ॥
जातां मंगल जमुना-तीरीं सुभग गोप-नारी ।
ऐके मंजुळ, दिव्य-मधु-स्वन कर्ण-मनोहारी ॥ ११ ॥
पवनलहरिंतुनि इतःस्तत ती गान-सुधा-धारा ।
वहात जाई पावन करि भू-भाग तसा सारा ॥ १२ ॥
अहा ! लोटला अमृत-रसाचा स्रोत भुवीं काय ? ।
गान-रसीं वसुमती तरंगत स्वर्गीं जणूं जाय ॥ १३ ॥
कुंजोद्भव मधु-वेणु-नाद तो चराचरां सकलां ।
लुब्ध करी, मग लुब्ध कां न हो वदा गोप-बाला ? ॥ १४ ॥
चित्त रंगलें, लक्ष वेधलें, हृदयंगम नादीं ।
काम राहिलें, भान हरपलें, रमली त्या छंदीं ॥ १५ ॥

श्रवण-मनोहर मुरलि-रवानें कर्षुनि व्रज-बाला ।
कुंजीं नेली, जयांत होता नंदलाल रमला ॥ १६ ॥
मरकतमणिमय जणूं शिलासनिं बसे गोपराणा ।
वेणुरवा छेडुनी रंजवी खग-मृग सकलांना ॥ १७ ॥
भक्त-मयूरी दर्शनोत्सुका स्वन-लोलुप-रामा ।
दृष्टि जुळवुनी वृत्ति मिळवुनी निरखि घनःश्यामा ॥ १८ ॥
वेणुरवाच्या नादलहरिनें मंत्रमुग्ध बनुनी ।
नाद-ब्रह्मीं लीन जहाली नयन-सुभग रमणी ॥ १९ ॥
दिव्य प्रीती दिव्य शांतता दिव्य स्वर्गान !
दिव्य-द्युति-संपन्न दृश्य तें वर्णिल कवि कोण ? ॥ २० ॥
नादरसाच्या तरंगिं त्या किति ब्रह्मांडें भरलीं ।
नादवि "कृष्ण-सुमंत" प्रीतिनें मग "मोहन-मुरली" ॥ २१ ॥

पणदरें. —कृष्ण सुमंत.

---

## स्फुट सुभाषितें.

सौख्य दे जगिं समास समान ।
वैपरीत्य करितें बहु घाण ॥

* * *

भुजबळ नच येथें, कार्य दे गोडवाणी ।

* * *

मोठा मी शूर मी, मी भुजबलयुत, मी दक्ष, मी कार्यकर्ता ।
मी वाग्मी, मी विपश्चित्, धन-जन-पति मी, मूर्खता ही अहंता ॥
कर्ता तो एक सृष्टिस्थिति-लय विरची जो स्वसंकल्पमात्रें ।
सर्वांतःसूत्रधारी; स्थिरचिर गमती शुद्ध हीं नाट्य पात्रें ! ॥ १ ॥

* * *

सर्वात्मा पुरुष अनंत सर्वशक्ति ।
घालाया असुर बली रसातलांतीं ॥
तद्द्वारीं धरुनि सुनीचरूप जाये ।
साधावें स्वहित जशा--तशा उपायें ॥ १ ॥

* * *

जे सुज्ञ ते सतत पाहुनि देशकाला ।
तैसेंच आणुनि मनीं स्वपरिस्थितीला ॥
टाकूनि पाउल जगीं सुखभोग घेती ।
जे चालती उलट, ते श्रम पावताती ॥ १ ॥

* * *

भेदांत दुःख वसतें; सुख तें अभेदीं ।
हें नैकवार कथिलें सरहस्य--वेदीं ॥

* * *

एकांत हा परम घातक सद्गुणांचा ।

* * *

कामार्त ते सतत होति विवेकहीन ।

* * *

मनोजवास रोखितां भलेभलेहि भागले ।

* * *

किल्ला घेण्यास सोपा परि नच अबला हें मनीं वाक्य ठेवा ।

* * *

विश्वेशा निरुपम रूप संपदाही ।
प्रेमें त्वां दिलि अबलांस; किंतु नाहीं ॥

नीचांहीं परि विपरीतकल्पकांहीं ।
ती केली जगतिं अनंत दुःखदायी ॥ १ ॥

* * *

सिंहाचें नखर, सुवर्ण कंजुषाचें ।
शूराचें प्रहरण, नाभही मृगाचें ॥
साध्वीचें स्तनयुग; पांचवें पराला ।
लाभेना जंववरि जीव नाहिं गेला ॥ १ ॥

* * *

प्रसंगीं टिके तोच हो वीर धन्य ।
प्रसंगच्युतीतुल्य हानी न अन्य ॥

* * *

स्वसंरक्षण त्राण वा दुर्बलाचें ।
बिजें याहुनी चीज नाहीं बलाचें ॥

—म. ह. मोडक बी. ए.

बडघवली.

---

# आजची स्वारी

( भूपती खरें तें० )

आजच्या स्वारिला हिंदू तितका एक
गरुडाची व्योमीं अटकपार ही फेंक
आजच्या स्वारिचा झोंकहि अगदीं न्यारा
आम्हांस एक हो राष्ट्रदेव तो प्यारा
आजच्या स्वारिचा जगांत डंका गाजे
कीं हिंदुधर्म हा भानु नभांत विराजे

आजच्या स्वारिचें स्वतंत्रता हें ध्येय
भारतभूमाता-वैभव-यश-सद्धेय
    ही स्वारी बहु नवलाची । निवतसे
    स्वर्गांत पंक्ति अमरांची । बघतसे
    घोषणा वीर-नामांची । घुमतसे
आजच्या स्वारिची खडाजंगि रिपु संगें
केसरी वीररस रंग त्यांत ही रंगे ॥ १ ॥

आजच्या स्वारिला जमीन वा अस्मान
प्रेमांत वाटती रावरंक सममान
आजच्या स्वारिचें चित्र कुणी काढावें
इतिहासकार ते पुढील त्यांना ठावें
आजची स्वारि ही लोह-गोल कीं लाल
शत्रूंचे पुतळे रणीं खाक करणार
आजच्या स्वारिच्या ऐक्याचा ध्वज हातीं
विसरुनी सर्वही भिन्नमतांच्या जाती
    मत्सरा या क्षणीं पायीं । तुडविलें
    त्या चुगलखोरिला दूरी । उडविलें
    तें भोळेपण पाताळीं । दडविलें
आजच्या स्वारिचे बोल जगांत विलोल
"ये यथा मां प्रपद्यन्ते" तत्त्व अमोल ॥ २ ॥

आजची स्वारि ही करि कंदुक रविगोला
धरि आनंदानें भालीं चंद्रकलेला
आजची स्वारि ही खेळवि कंठिं भुजंगा
निज जटेंत ठेवी गुप्त सुरधुनी गंगा

आजच्या स्वारिचा दाहिदिशांस दरारा
अणुरेणू-मधुनी ठेवी चालू मारा
आजची स्वारि ही कलिकालाचा काळ
कुणि येवो चालुनि धरुनि रूप विक्राळ
धर्मांत शंभु अवतारी । होतसे
राष्ट्राच्या मग संसारीं । भय कसें
गीतेंत बोल कंसारी । वदतसे
आजची स्वारि ही कोहिनूर हो भावी
शाहीर "वसंतविहार" कोंदणी ठेवी ॥ ३ ॥

४-१०-२४ दादर. —वसंतविहार.

---

## पञ्चवटी वर्णन

( चालः—सुटला पितृदिशेचा वारा )

वन हें सुखवी किति तरि नयनां ।
सुमनें सुगंधि फुलली नाना ।
या जाइ जुईच्या लता । देवपूजना ।
वनवासि जनांच्या येती सखये ! मनां ॥ १ ॥

शीतल मंदपवन व्याधूता ।
कोमल पल्लवकरिं या सुलता ।
आदरिति जेविं कुलसुता । निजगृहागतां ।
तुज तेविं सखे ! या करिति जणूं स्वागता ॥ २ ॥

तरु हे उंच असति किति तरी ।
जाती भेदुनि गगनांतरीं ।
कांतारलक्ष्मिच्या गमे । कीर्तिची सरी ।
हे इच्छिति सारे नेण्या स्वर्गावरी ॥ ३ ॥

रव हे निर्झर मृदुतर करिती ।
सुस्वर त्यांतचि पिकतति गाती ।
हे ताल धरुनि बघ सुदति ! । हरिण नाचती ।
संगीत करुनि कीं वनशोभा वानिती ॥ ४ ॥

करि ही नृत्य मयूरावली ।
त्यांतचि शशतति नादावली ।
आनंदरूप या स्थलीं । खास मैथिली ! ।
सखि ! जन्मरिपूही करितिल मैत्री भली ॥ ५ ॥

ठायीं ठायिं विमल कासारीं ।
निर्मल तव हृदयापरि वारि ।
नव पंकजसरि त्यावरी । पाहि सुंदरी ! ।
तव वदन श्रीतें अनंत गुण ही करी ॥ ६ ॥

निसर्गनिर्मित कुञ्जविहारी ।
मंजुळ सखि ! गुञ्जारवकारी ।
हा मत्त मधुप सुदरी । मुदित अंतरीं ।
जणुं दयिताकर्णीं रहस्य कथना करी ॥ ७ ॥

क्रीडति चक्रवाकि मिथुनें हीं ।
सीमा प्रणयरसाची पाही ।
या चक्रवाकि पतिविरहिं । विकल शोभती ।
रामाविण सीता नाहिंच हें बोधिती ॥ ८ ॥

वन हें आधिंच नंदनवनसें ।
त्यांतचि मधुर तुझ्या सहवासें ।
अवतीर्ण स्वर्ग राजसे ! भूवरी असें ।
वनवासी आम्हां कोणि म्हणावें कसें ! ॥ ९ ॥

॥ इसूर. —मा. ना. आचार्य.

---

# सद्गुरु शरणागति

[ इन्फ्लुएन्झाचे सालीं कोणाची स्त्री, कोणाचा पुत्र, कोणाचा बंधु, कोणाची माता, आशा मृत्युवार्ता रोजरोज कानीं पडल्यानें चित्त उद्विग्न झालें असतां आलेले उद्गार. ]

[ मालिनी. ]

जवळि जवळि आला वाटतें काळघाला ।
सुहृद जन जिवींचा तोहि स्वर्गस्थ झाला ॥
निशिदिनिं हृदयाला टोंचितो शोक भाला ।
म्हणुनि शरण आलों सद्गुरो ! त्वत्पदाला ॥ १ ॥
घडिभरि करमेना चित्त अस्वस्थ झालें ।
सुख सकल पळालें, दुःख येऊनि ठेलें ॥
विषम विष तसा हा घोर संसार झाला ।
म्हणुनि शरण आलों सद्गुरो ! त्वत्पदाला ॥ २ ॥
कर कर कर ऐसा फार अभ्यास केला ।
शरिर सुकुनि गेलें ज्वानि गेली लयाला ॥
अवचित इतक्यांतीं काळ सन्नीध आला !
म्हणुनि शरण आलों सद्गुरो ! त्वत्पदाला ॥ ३ ॥

किसलयमृदुगात्रा लागुनी सुंदरीच्या ।
परम सुखद मौजा खेळलों मी परीच्या ॥
परि विरह तियेचा आजि आला कपाळा ।
म्हणुनि शरण आलों सद्गुरो ! त्वत्पदाला ॥ ४ ॥

पइ पइ करुनीयां जोडिल्या द्रव्यराशी ।
धन बहु सुख देतें वाटुनी अंतराशीं ॥
परि धन असुनीही दुःख डंखी उराला ।
म्हणुनि शरण आलों सद्गुरो ! त्वत्पदाला ॥ ५ ॥

हय गज रथ ऐशा नश्वरा वैभवाला ।
भुलुनि सतत आत्मा तेथ म्यां सांत्वीला ॥
नकळत परि सारें लोपुनी घात झाला ।
म्हणुनि शरण आलों सद्गुरो ! त्वत्पदाला ॥ ६ ॥

मरणरहित सारें मानुनी दृश्यजात ।
अकृतविरह शंका वर्तलों मी तयांत ॥
परि सकल विनाशी आजि सिद्धांत झाला ।
म्हणुनि शरण आलों सद्गुरो ! त्वत्पदाला ॥ ७ ॥

दृढ उरिं धरियेला थोर संसार खोटा ।
द्रविणगुणवयाचा मानिला फार ताठा ॥
भ्रमतिमिर उडाला बोध भानू उदेला ।
म्हणुनि शरण आला सद्गुरो ! त्वत्पदाला ॥ ८ ॥

पडघवली.

—म० ह० मोडक बी. ए.

---

[ कवींद्र रवींद्रनाथ टागोर यांच्या जगन्मान्य गीतांजलींतील १०१ गीत. ]

# प्रासादाच्या द्वाराशीं

( अभंग )

जन्मभरीं नित्य माझिया गीतांनीं । पाहिलें शोधोनी तुजदेवा ।
दुजा द्वारामाजीं एका द्वारांतून । नेलें सांभाळून मज त्यांनीं ।
त्याच गीतीं झालें माझें ज्ञान मज । रजांतहि गज सामावला ।
अंतर्मुख झाली माझी पूर्ण दृष्टि अंतर्याम सृष्टि दिसों लागे ॥ १ ॥

माझिया गीतांनीं मज पढविलें । पाठ सर्व दिले आजवरी ।
गुप्त पथ तेही दाखविले त्यांनीं । सुखाचिया यानीं बसविलें ।
माझिया हृदय क्षितिजाचे वरी । तारे बहुपरी दाखविले ।
माझिया नेत्रांना आणुनिया शोभा । लावियलें लोभा देवा तव ॥ २ ॥

सुख दुःखाचिया प्रदेशांत कांहीं । गूढ रहस्येंही उकलुनी ।
सर्व दिनभरी वाट दाखविली । उपकृति केली मजवरी ।
आतां अंतीं कोण्या प्रासादाच्या द्वारीं । मज सायंकालीं आणियलें ।
संपला प्रवास जाहली अखेर । "वसंतविहार" गीत गाय ॥ ३ ॥

५-८-२२, दादर. —वसंतविहार.

ग्रंथ संग्रहालय

# एकच मागणें

( अभंग )

एकरसीं नवरसकारें   कांहीं बोलिलों उत्तरें
हें तों पाहिजे साहिलें   त्वांचि ब्रह्मा बहुरस केलें
बहुशाखा माझ्या चित्ता   एके ठायीं आवरि दत्ता !
भेदभाव निरसोनियां   पाय दावीं सद्गुरुराया
दास म्हणे निरंजना
आन नावडो या मना

—मा. ना. आचार्य.

इत्यलम्

॥ श्री सद्गुरु चरणार्पणमस्तु ॥



# संगीत लघु शाकुंतल.

( लेखकः—मार्तंड नारायण आचार्य, सं. कीर्तिसिंह; सं. सतीप्रभाव इत्यादि नाटकांचे कर्ते ).

कै० किर्लोस्करकृत शाकुंतल मराठी रंगभूमीवर साग्र होणें दुरापास्त झालें असल्यामुळें महाकवि कालीदासाच्या एका जगद्विख्यात् नाटकाला मराठी रंगभूमीला जवळ जवळ पारखें व्हावें लागलें आहे हें लक्षांत घेऊन, श्रीमंत बाबासाहेब घोरपडे इचलकरंजीकर यांनीं शाकुंतलाचें सुष्ठुतर काव्य-युक्त असें लघुकरणात्मक भाषांतर करण्यासाठीं बक्षीस लावून मागविलेल्या नऊ ग्रंथांत पहिलें आलेलें हें नाटक आहे.

## कांहीं तज्ज्ञ विद्वान् रसिकांचे अभिप्रायांतील उतारेः—

......मूळांतील गाळलेला भाग रसहानि होणार नाहीं अशा रीतीनेंच गाळला गेला आहे त्यामुळें मुळांतील स्वारस्य कमी न होतां उत्तान शृंगार-पूर्ण अशा कांहीं वचनांनीं येणारा दोषही टळला आहे. एकंदर पुस्तकाची भाषा शुद्ध व सुबोध असून पद्येंही सुगम आहेत. निवळ मराठी वाचकांस संस्कृत कवीच्या कृतीचा अल्पायासानें आस्वाद घेतां येईल अशी एकंदर रचना आहे.

न. चिं. केळकर संपादक केसरी.

......कथानकाचा महत्त्वाचा धागा जाऊं न देतां नाटकाचा संक्षेप करण्यांत आपणांस बरेंच यश आलें आहे. किर्लोस्करांचें शाकुंतल, संगीत नाटकांतील पहिलाच प्रयत्न असल्यामुळें त्यांतील कवितांत मात्राभंग, अनु-चित शब्द प्रयोग इत्यादि अनेक दोष झाले आहेत. आपल्या पद्यांची रचना बरीच निर्दोष आहे ‘अधररागें स्पर्धते०’ ‘सुरतसार शोधन चतुरा०’

'स्वयें मजशी जरि सखी०' 'पाहे मज हरिणाक्षी०' अशी कांहीं पद्यें विशेष निर्दोष व सुंदर वाटलीं.

श्री० कृ० कोल्हटकर.

......लघु शाकुंतल हें पुस्तक आमच्या वाचण्यांत आलें आहे. मूळच्या नाटकांतील साधलेला परिपोष यत्किंचितही न सोडतां जशाचा तसा या नवीन कृतींत ओतलेला आहे. एखाद्या ग्रंथाचें लघुकरणाचें कार्य मोठें अवघड असतें आणि या साठीं रा० आचार्य यांचें अभिनंदन करावेसें वाटतें. दुसरें असें कीं, मूळचें काव्य रा० आचार्य यांनीं फार परिश्रमानें प्रसादपूर्ण काव्यांत मराठींत आणिलें आहे. फार काय पण आम्ही प्रत्येकास अशी शिफारस करितों कीं, रा० आचार्य यांचें लघु शाकुंतल नाटक आणि विशेषतः त्यांतील काव्य वाचावें म्हणजे त्यांना महाकवीच्या प्रतिभेचें, उदात्त कल्पनांचें आणि पद लालित्याचें निकट सान्निध्य घडेल. त्यांच्या काव्यापासून मनाला अत्यंत आनंद झाला.

एकंदरींत रा० आचार्य यांचा प्रयत्न स्तुत्य आहे व त्यांनीं आरंभिलेल्या कार्यांत त्यांना चांगलें यश लाभलें आहे असें वाटतें आणि त्यासाठीं रा० आचार्य यांचें पुन्हां एकवार आभार पूर्वक अभिनंदन करितों.

**वासुदेव विनायक जोशी,** बी. ए. एल्‌एल्. बी. वकील.

संपादक 'सहविचार' बडोदें

सदरहू नाटक केवळ रंगभूमीच्याच सोयीसाठीं लिहिलें आहे. करितां कोणाही प्रसिद्ध नाटक मंडळीस प्रयोगासाठीं पाहिजे असल्यास त्यांनीं ताबडतोब खालील पत्त्यावर पत्रव्यवहार करावा.

**सदाशिव कृष्ण उपाध्ये,**

चिटणीस "कविमित्र--मंडळ"

दादर—मुंबई.

REFBK-0019897
REFBK-0019897

# शुद्धिपत्र

| पृष्ठ | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
| --- | --- | --- | --- |
| ९ | १० | नवां | नेतां |
| १४ | ५ | हातसें | होतसें |
| १६ | ७ | बघ | बघें |
| १६ | १० | हावान | हातानें |
| १७ | ६ | भृकुटि | भ्रुकुटि |
| १८ | ९ | सांगावें | सांगवें |
| १९ | २ | मानीं | मनिं |
| १९ | ३ | तम | तव |
| २१ | २१ | राहाण | रोहिणि |
| २२ | ७ | मालती | मालति |
| ३६ | १३ | स्मरतार | स्मेरतार |
| ४७ | ११ | घेत | घेते |
| ४८ | कविता २७ खालीं स्टार नाहींत | | स्टार पाहिजेत |
| ५० | १७ | इतःस्तत | इतःस्तता |
| ५६ | १६ | वदनं श्रीतें | वदनश्रीतें |
| ५६ | १९ | सुदरी | सुंदरी |
| ५६ | २१ | चक्रवाकि मिथुनें | चक्रवाक-मिथुनें |
| ५८ | २० | आळा | आलों |

---


## नाथ निफाडकरांचीं पुस्तकें.

१ सोनपत पानपत ०—४—०

२ सतीचा शाप ०—४—०

"लोकमान्य" कार्यालय, धुळें.

अपूर्व ग्रंथ ]   तावडतोब नांवें नोंदवा   [ उत्कृष्ट काव्य

किंमत १ रु.] संगीत लघु शाकुंतल [ट. ख. निराळा

[ लेखक–मार्तंड नारायण आचार्य ]

नऊ ग्रंथांत पहिलें ठरलेलें. प्रौढ पण सुगम भाषासरणी, शास्त्र शुद्ध रचना, रसभावानुकूल यथोचित चालींमुळें आलेलें नितान्त सुंदर नादमाधुर्य इ. गुणांनीं रसिकांना मोह पाडणारा हा अभिनव सुंदर ग्रंथ लवकरच मंडळामार्फत प्रसिद्ध होईल. श्री. तात्यासाहेब केळकर-सं. केसरी, श्री. तात्यासाहेब कोल्हटकर, श्री. वा. वि. जोशी सं. सहविचार बडोदें, इ. तज्ज्ञ विद्वान् रसिकांचे मार्मिक अभिप्राय.

ता. ३० एप्रील १९२५ पर्यंत आगाऊ नांवें नोंदविणारांस पुस्तक पाऊणपट किंमतींत मिळेल ट. ख. निराळा. तसेंच आगाऊ आॅर्डर देणाऱ्या बुकसेलर्सना विशेष सवलत. पत्रव्यवहार करावा.

चिटणीस कविमित्रमंडळ--दादर, मुंबई.

शब्द संग्रह ( इन्फंट व पहिल्या इयत्तेकरितां ) ह्यांत सुमारें साडेतीन हजार शब्द असून उजळणी व बाराखड्यांचाही अंतर्भाव केला आहे. किंमत फक्त २॥ आणे. व्यापारी व शिक्षक यांस शेंकडा २० कमिशन मिळेल.

तसेंच आमचे येथें काव्यविषयक व शालोपयोगी इतर पुस्तकें विकत मिळतील.

गणेश एजन्सी,

साजवाडी, दादर--मुंबई.